
तन-मन
रत्नाकर मतकरी



# तन-मन

रत्नाकर मतकरी

मेहता पब्लिशिंग हाऊस

**TAN-MAN** by RATNAKAR MATKARI
तन-मन / नाटक
रत्नाकर मतकरी
© सौ. प्रतिभा मतकरी
राधा निवास, टिळक रोड, दादर, मुंबई - ४०००१४.
प्रकाशक : सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ,
पुणे - ४११०३०. ✆ ०२०-२४४७६९२४
Email : info@mehtapublishinghouse.com
Website : www.mehtapublishinghouse.com
मुद्रक : मुद्रा, ३८३ नारायण पेठ, पुणे - ३०.
प्रकाशनकाल : जुलै, २००५ / ऑगस्ट, २००८ / पुनर्मुद्रण : नोव्हेंबर, २०१३
मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी
छायाचित्रा : संजय पेठे
डी. आर. एम्. नं. ९९/२००४
ISBN 81-7766-560-X

---

या नाटकाचे अन्य भाषोत रुपांतर, चित्रापट, चित्रामालिका इ. सर्व प्रकारचे अधिकार रत्नाकर मतकरी व प्रतिभा मतकरी यांच्या स्वाधीन आहेत. प्रयोगासाठी पूर्वपरवानगी आवश्यक.

माझा सामाजिक कार्यकर्ता मित्रा,
प्रमोद निगुडकर
यास, ‘एड्स’ विषायातील त्याच्या समरसतेसाठी,
प्रेमपूर्वक...

# मानसीचे मनोगत

'तन-मन' हे माझ्या बाबांचं, मी नायिका म्हणून भूमिका केलेलं, पहिलं व्यावसायिक नाटक. गंमत म्हणजे ही वस्तुस्थिती फार उशिरा, म्हणजे रंगीत तालमींच्या जवळपास माझ्या लक्षात आली. यापूर्वी मी बाबांची अनेक प्रायोगिक नाटकं, बालनाट्यं यांतून प्रमुख भूमिका केल्या होत्या. 'आम्हाला वेगळं व्हायचंय' या तीन नायिका असलेल्या आणि 'घर तिघांचं हवं' या, अशा त्यांच्या दोन व्यावसायिक नाटकांची मी प्रत्येकी एक-तृतियांश नायिका होते. अन्य लेखकांच्या व्यावसायिक नाटकांत अनेकदा मध्यवर्ती भूमिकाही करुन झाल्या होत्या.

पण... रत्नाकर मतकरी या दिग्गज लेखकाच्या नव्याकोऱ्या व्यावसायिक नाटकाची एकमेव नायिका असणं! अर्थातच, प्रयोगाचा अर्धा भार नायकाच्या आणि अर्धा भार माझ्या शिरावर येणार! प्रेक्षाक नाटकाकडून आणि पर्यायानं माझ्याकडून प्रचंड अपेक्षा ठेवणार! शिवाय नाटकाच्या यशापयशाला जबाबदार असलेल्यांपैकी एक व्यक्ती मीही असणार!...त्या क्षाणी मी खचलेच!

त्यानंतर माझ्यासमोर एकच मार्ग होता – तो अस्वस्थ करणारा विचारच मी बाजूला सारला आणि पहिल्यासारखंच पुन्हा भूमिकेमध्ये स्वत:ला गुंतवून घेतलं.

आत्ताही, ही प्रस्तावना लिहिताना तसंच काहीसं झालंय आणि या वेळीही दडपण बाजूला सारुन मी प्रामाणिकपणे नाटकाविषयी मला जे जे सांगावंसं वाटतं, ते सांगायचं धाडस करतेय. माझी भूमिका जशी स्वीकारली गेली, तसेच हे विचारही स्वीकारले जातील, या विश्वासानं.

'तन-मन' हे नाटक म्हणजे मतकरींच्या नाट्य-लेखनातल्या अनुभवी सराईत कारागिरीचा सुबक नमुना आहे, हे, हे नाटक पहिल्यांदा ऐकल्यावरच आम्हा सर्वांना जाणवलं; पण तेवढ्यावर या नाटकाचं महत्त्व संपत नाही हे अधिकाधिक जाणवत गेलं, ते नाटकाची पुढची वाचनं, तालमी नि प्रयोगांदरम्यान.

या नाटकात मोजून चार पात्रां. *(या चार पात्रांखेरीज इतर अगदी छोटी दोनतीन पात्रां. पूरक. घराबाहेरच्या समाजाचं प्रतिनिधित्व करणारी. एकाच नटानं ही सगळी रंगवली, तर एकसंध परिणाम उभा राहील, अशी)*. तर, या चार पात्रांमध्ये आणखी चारदोन पात्रांची भर घालून नाटकात काही खेळीमेळीचे प्रसंग, काही भावनिक ताणतणाव, काही टोकाच्या आणीबाणीचे क्षाण मतकरी सहज आणू शकले असते, जेणेकरुन नाटक घणाघाती किंवा रुढार्थानं व्यावसायिक नाटकाचा जो साचा बनून गेला आहे, त्या प्रकारातलं झालं असतं. पण नेहमीच्या, नवे प्रयोग करुन पाहण्याच्या सवयीला अनुसरुन त्यांनी इथं तसं न करताही परिणाम साधता येतो का, हे यशस्वीरित्या पडताळून पाहिलेलं दिसतं. त्यांच्या या प्रयोगामुळे फाफटपसारा टाळला जाऊन नाटकाला

एकप्रकारची तीव्रता आणि प्रेक्षाकांच्या मनाला भिडणारा थेटपणा प्राप्त झाला आहे.

संवाद, ही या नाटकाची आणखी एक खासियत. वरवर पाहता साध्या, सरळ, रोजच्या बोलण्यातल्या भाषोतले वाटणारे हे संवाद, 'छुपे रुस्तुम' आहेत, असं माझं स्पष्ट मत आहे. लहानपणापासून 'बाबांनी लिहिलेले संवाद सहज पाठ होतात' म्हणून फुशारक्या मारणारी मी; पण 'तन–मन'च्या संवादांनी माझी पार झोप उडवली! अर्थात, या कारणासाठी ते खास आहेत, असं मी म्हणत नाहीये; तर त्यांचं सौंदर्य दडलंय, ते त्यातून व्यक्त होणाऱ्या वैचारिक द्वंद्वामध्ये! एखादा संवाद समोरच्या पात्राला निरुत्तर करणारा वाटतो, तर त्यावरचं समोरच्याचं उत्तर आधीच्या संवादाला पूर्णपणे नामोहरमच करतं! आणि तेही, केवळ एकमेकाला बोलण्यात हरवण्याच्या उथळ पातळीवर घडत नसून, प्रत्येकाच्या प्रामाणिक विचारप्रदर्शनातून घडलेलं दिसतं. अशा प्रकारे, हे संवाद म्हणजे लेखकाची प्रेक्षाकाला दिपवण्याची एक क्लृप्ती न राहता, रंगभूमीचं एक लेणं बनून जातात. पहिल्या अंकातला, मानसीचा, खोजा हाऊसमधून परतल्यानंतर घडणारा जयबरोबरचा प्रदीर्घ संवाद, हे या सर्वांगसुंदर संवाद लेखनाचं ठळक उदाहरण.

जय आणि मानसी या, तसं पाहायला गेलं, तर समाजात नेहमी पाहायला मिळणाऱ्या प्रातिनिधिक व्यक्तिरेखा. पण 'तन-मन' मध्ये त्यांचं जे चित्राण आहे, ते पाहून 'ऑलवेज फेल्ट, बट नेव्हर सो वेल एक्स्प्रेस्ड!' या इंग्रजी विधानाची आठवण होते. मोठ्या लेखकांच्या कलाकृतींचा आस्वाद घेताना, बऱ्याचदा, 'हे सगळं आपणही असंच अनुभवलंय, पण या कलाकारानं ते जसंच्या तसं मांडतानाही काय किमया केलीय कोण जाणे, पण सगळं इतकं खास झालंय!' अशी वाचकाची भावना होते. नेमकं तेच, या पात्रांच्या चित्राणात मतकरींना गवसलंय, असं मला वाटतं. ही दोघं इतकी खरी आहेत, की जयचं पूर्णपणे चुकीचं वागणं, त्याची त्यानं दिलेली वरवरची समर्थनं – या सगळयासकट जय प्रेक्षाकाला खूप जवळचा वाटतो आणि मानसीही तिच्या निष्ठुर – सडेतोड वक्तव्यांसह कायम आपलीशी वाटते. रक्ताच्या नात्याची माणसं आपण त्यांच्या गुणावगुणांसह स्वीकारतो, तसंच आणि तितक्याच सहजतेनं हे घडतं. एकंदरीत, प्रेक्षाकांना काय प्रकारची पात्रां आवडतात, याचे माझे तरी आजवरचे सगळे ठोकताळे या जय आणि विशेषात: मानसीनं पूर्णपणे खोटे ठरवले!

पुरुषांनीच पुरुषांच्या मानसिकतेचं केलेलं अत्यंत प्रांजळ विश्लेषाण, हा 'तन-मन'- चा एक महत्त्वाचा पैलू. नाटकात 'राजन' ही व्यक्तिरेखा या पैलूसाठी राबवली जाते आणि त्यामुळेच ती केवळ 'नायकाचा मित्रा' अशा भूमिकेच्या जुन्या साच्यात मोडली न जाता अगदी आजची होते. याचप्रमाणे, आईच्या व्यक्तिरेखेमुळे कालच्या आणि आजच्या स्त्रीच्या दृष्टिकोनातला आमूलाग्र फरक अधोरेखित होतो. नाटक या दोन व्यक्तिरेखांच्या आधारानं आजचं आणि तत्त्वनिष्ठ, प्रामाणिक अशा आशादायी उद्याचंही होतं.

'तन-मन' समस्याप्रधान आहे. या नाटकातली समस्याही तशी 'जीवघेणी' आहे. नाटकात ती त्याच तोलामोलाच्या गांभीर्यानं हाताळलीही गेली आहे आणि तरीही हे नाटक केवळ त्या समस्येसाठीच लिहिलं गेलं आहे, असं वाटत नाही. समस्येच्या निमित्तानं

ते, नवरा-बायकोच्या नीती-अनीतीच्या कल्पनांना वाचा फोडतं – आणि समस्येपेक्षाही भयावह अशा, परस्परविरोधी विचारांच्या बैठकीवर वाढलेल्या स्त्री-पुरुषांच्या, पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या मूलभूत ‘वेगळे’पणावर फार मार्मिक भाषय करतं. ‘तन-मन’चं खरं मोठेपण आहे, यातच आहे.

आजच्या – सर्वांनीच चित्रामालिकांना प्राधान्य देण्याच्या काळात, ‘तन-मन’ला, दृष्ट लागेल अशी टीम लाभली. सर्वांनीच या नाटकात जीव ओतला आणि त्यामुळेच नाटक रंगभूमीवर येण्यापर्यंतचा प्रवास आम्हा सर्वांसाठीच खूप आनंदमय झाला. विशेषात: तुषारचं, नाटक प्रथम ऐकल्यापासून आजपर्यंतचं भूमिकेनं झपाटून जाणं, नाटकाचे अधिकाधिक प्रयोग व्हावेत म्हणून विशेषा प्रयत्न करणं, मंगेशचं, नाटकाचा वेगळा पिंड ओळखून दिग्दर्शकीय बारकावे भरण्यापासून ते वेळ पडताच स्वत: नाटक चालवायला घेण्यापर्यंत पावलं उचलणं आणि आम्हा चारही प्रमुख पात्रांचा एकमेकांमध्ये तयार झालेला प्रचंड ‘रॅपो’ या गोष्टी जमून आल्या, हा एक हृद्य योग. नाटक रंगभूमीवर आल्याआल्याच, उत्तमोत्तम परीक्षाणांनी आमचा हुरुप वाढवला आणि अल्फा व म.टा. गौरव नामांकने (सर्वोत्कृष्ट लेखक, दिग्दर्शक, अभिनेत्री, साहाय्यक अभिनेत्री) यांनी त्यावर कळस चढवला.

आजही हे नाटक मुंबई-पुण्यातच नाही, तर गावोगाव पोहोचतं आहे, ही खूपच आनंदाची आणि समाधानाची गोष्ट आहे. त्यासाठी डॉ. अलका गोगटे, श्री. प्रमोद निगुडकर आणि मुंबई जिल्हा एड्स नियंत्राण समिती, तसेच महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्राण समिती व तिचे संचालक श्री. संजय सावंत यांचे आम्ही आभारी आहोत.

मतकरींच्या लेखनप्रवासाला यंदा, १६ फेब्रुवारी २००५ रोजी पन्नास वर्षो पूर्ण झाली. त्या निमित्ताने मतकरींच्या आजवरच्या लिखाणाला साजेशा, समाजाची बांधिलकी स्वीकारणाऱ्या या नाटकाचं प्रकाशन होतंय, ही खूपच औचित्यपूर्ण गोष्ट.

मी आज ‘तन-मन’च्या प्रयोगांपासून दूर आहे – पण या प्रस्तावनेच्या निमित्तानं पुन्हा एकदा या सुरेख नाटकात गुंतून जाण्याची संधी मला दिल्याबद्दल प्रकाशकांचे मन:पूर्वक आभार.

– सुप्रिया विनोद

अंक पहिला

## प्रवेश : १

मानसी आणि जयेश गायतोंडे या उच्च मध्यमवर्गीय जोडप्याच्या देखण्या घराचा हॉल.
संध्याकाळी सातचा सुमार.
टेबलवर उघडे पुस्तक. उघडे पॅड. उघडे पेन, आणि वाचायचा चष्मा. शास्त्रीय संगीताची कॅसेट चालू आहे...
मानसी – तिशी-बत्तीशीची टापटीप स्त्री – उघड्या दरवाजात उभी राहून आपल्या चार वर्षांच्या मुलीशी – तनूशी – बोलतेय.

मानसी : पण मस्ती नाही हं करायची! आणि मागायचं नाही काही त्यांच्या इथलं! – भांडायचं नाही पिंकीशी...

तनू : *(बाहेरुन)* - पण डॅडी आला की सांगशील ना तू मला गार्डनमध्ये न्यायला?

मानसी : हो – तोवर तू खेळ शेजारी. आणि घरातच खेळा हं – बाहेर नका येऊ....बाय्!

*(क्षणभर तिथेच थांबून ती तनू शेजारी गेल्याची खात्री करुन घेते. मग आत येऊन दार लावून घेते. टेबलाशी येते. चष्मा लावून, नोट्स काढीत वाचू लागते.
दाराला चावी लावल्याच्या आवाजाने मानसी पुस्तक बंद करते. खुर्ची बाजूला करुन उठते. दरवाजा उघडून जयेश आत येतो. त्याच्या हातात ब्रीफकेस व एक कागदाचा रोल. जय मानसीहून दोनेक वर्षांनी मोठा. देखणा, सुदृढ. अंगात उत्तम फॉर्मल कपडे. सैल केलेला टाय. कोट हातावर. पॅसेजमधेच मानसी जयेशला भेटते. मिठी मारते. तो तिच्या डोक्याची चुंबने घेतो.)*

जयेश : अग, अग – *(नंतर ब्रीफकेसमधून काढून देत)* हे तुझं कॅलिग्राफीचं पुस्तक आणि हा ड्रॉइंग पेपर. आता करा हवेत ते पोस्टर्स, लावा घरभर. 'आदर्श संसार', 'प्रेम द्या-प्रेम घ्या!', 'आरोग्य राखा : मनाचे नि शरीराचे!'

मानसी : तुला काय माहीत?

जयेश : वाऽ ! मी वाचलं तू लिहून ठेवलेलं! – घरासाठी पोस्टर्स करणारेयस ना?

मानसी : – वेडा! अरे, सुखी संसाराची कोणी पोस्टर्स लावून जाहिरात करतं का? हे पोस्टर पेपर्स नि हे पुस्तक कॉलेजमधल्या कॅलिग्राफी वर्कशॉप- साठी – त्या स्लोगन्सही त्यासाठीच. – जा, कपडे बदल मी चहा आणते!
*(किचनमध्ये जाते.)*

*(जयेश, प्लेअरवरच्या संगीताबरोबर गुणगुणतच, ब्रीफकेस जागेवर ठेवतो. खिशातला मोबाइल काढून टेबलवर ठेवतो. टाय काढतो, आणि शर्ट काढतच बेडरुममध्ये जातो.*

मानसी चहाचा ट्रे घेऊन बाहेर येते. ट्रेमधे किटली, कप, बशा इ. टी शर्ट चढवून जयेश बाहेर येतो. कॅसेट संपते. मानसी चहा कपात ओतते. जयला देते.*)*

जय : मानसी, आय लव्ह अवर टी टुगेदर.
*(*मानसी कप घेऊन बसते.*)*

मानसी : आज विशेष काय ऑफिसात?

जयेश : नथिंग स्पेशल. रोजचाच रामरगाडा. – हां स्टेट्सना पेपर पाठवण्याची एक मोठी ऑर्डर आजच कन्फर्म झाली. त्या निमित्तानं मनचंदाशेठनं सगळ्या स्टाफला कॉफी-सँडविच दिले.

मानसी : अरे वा!

जय : 'अरे वा!' काय? डिसूझा म्हणतो त्याप्रमाणे, बॉसनं वाढीव कामाची नांदी केली... आता तुझं बातमीपत्रा –

मानसी : अरे, माझ्याकडे ना, स्पेशल बुलेटिनच आहे तुला सांगायला.

जयेश : टेरिफिक! गो अहेड!

मानसी : माझी आज चक्क मुलाखत घेतली दूरदर्शनच्या 'प्रियसखी' कार्यक्रमासाठी! ...डायरेक्ट कॉलेजात येऊन!

जयेश : *(*मुलाखत घेणारीची नक्कल करीत*)* 'प्राध्यापक मानसी गायतोंडे, तुमच्या कॉलेजमधल्या लोकप्रियतेचं रहस्य काय?'...'तुम्ही संसार आणि करिअर यांची सांगड कशी घालता?'...'तुम्हाला ऑम्लेट करता येतं का?'...'तुमचा नवरा तुम्हाला मारहाण करतो का?'...

मानसी : *(*हसत*)* मी म्हटलं, होऽऽ

जयेश : *(*खोटे चमकून*)* काय? मी वाईट आहे, असं खोटं खोटं सांगितलंस?

मानसी : नाही. तू चांगला आहेस, असं खोटं सांगितलं. म्हटलं, मी कॉलेजमधून घरी पोहोचताक्षणी माझा नवरा चहाचा ट्रे घेऊन पुढं येतो... रोज सकाळी माझ्याआधी उठून स्वैपाकपाणी करुन ठेवतो... मुलीला दूध पाजतो...

जयेश : त्यांना वाटलं असेल, तू वरकामाच्या माणसाशी लग्न केलंयस!

मानसी : एक मात्रा मी अगदी खरं खरं सांगितलं!

जयेश : काय?

मानसी : आमचं दोघांचं एकमेकांवर आणि आमच्या मुलीवर अगदी गाढ प्रेम आहे... आम्ही एकमेकांशी अगदी एकनिष्ठ आहोत...

जयेश : हे कशाला सांगितलंस?

मानसी : अरे, ‘सुखी संसाराचं रहस्य’ हाच तर विषाय होता मुलाखतीचा!

जयेश : मग –? आम्ही दोघं बेडरुममध्येही एकमेकांना भरपूर सुख देतो, असं...

मानसी : मुलाखत दूरदर्शनसाठी होती... गॉसिप मॅगझिनसाठी नाही! मुख्य म्हणजे ती नटीची नव्हती – प्राध्यापिकेची होती!

जयेश : का? प्राध्यापिका काय बेडरुममध्ये –
*(मानसी त्याला गुद्दे मारु लागते. तो ते चुकवत खिदळतो.)*

मानसी : जा आटप – तनू तुझी वाट पाहतेय कधीची, गार्डनमध्ये नेण्यासाठी!

जयेश : आहे कुठं ती?

मानसी : शेजारी खेळतेय.

जयेश : मी आलोच शॉवर घेऊन.

मानसी : पळ – टॉवेल ठेवलाय बाथरुममध्ये!

*(तो जातो. मानसी कप, बशा इ. ट्रेमध्ये भरते व जाऊ लागते. इतक्यात टेबलावरचा जयेशचा मोबाइल वाजतो. मानसी ट्रे खाली ठेवून तो उचलते. त्याच्यावरचा मेसेज वाचते. मेसेज वाचून ती गोंधळते. अर्थ लागत नाही. ती विचारात पडते. तिला काहीतरी आठवते. क्षणभर कसली तरी भीती वाटते. ती मोबाइल खाली ठेवते. अचानक आठवण झाल्याप्रमाणे ट्रे उचलते, आणि आत जाते. दार ढकलून राजन – त्यांचा समवयस्क मित्रा आत – येतो.)*

राजन : *(ओरडून)* घरात कुणी आहे का? गृहिणी – नाहीतर गृहस्वामीऽ?

मानसी : *(लगबगीने बाहेर येते.)* बस राजन. जय येतोय शॉवर घेऊन!

राजन : चहाऽ!

मानसी : ठेवते. *(जाऊ लागते. मग थबकते. बोलू की नको, अशा विचारात.)*

राजन : काय झालं मानसी?

मानसी : थोडं बोलायचं होतं.

राजन : हात्तेच्या! मग बोल की!

मानसी : आत्ता नको! *(बाथरुमच्या दिशेने पाहात)* जय बाहेर गेला, की!

राजन : *(चमकून)* अरे –! आहे काय प्रकार हाऽ—?

*(ती आत जायला वळते. जयेश बाहेर येतो.)*

जयेश : राजन –! बरा आलास! मी चाललोय गार्डनमध्ये! – येतोस?

राजन : तनूबरोबर खेळायला? – नको रे बाबा! ती बागेत अशी चेकाळते की माझे केस ओढून, कान उपटून, माझ्या शर्टात माती टाकून, माझ्या पाठीत बुक्के मारुन माझी पार वाट लावून टाकते! *(जयेश हसतो.)* ...त्यापेक्षा मी इथंच बसतो तुझी वाट पाहात! दरम्यानच्या काळात चहा पितो मानसीच्या हातचा! आणि बघतो थोडा वशिला लावून पोहेबिहे मिळाले तर!

मानसी : पोहेबिहे नाही हं मी करत बसणार!- वेफर्स मिळतील फार फार तर! – आणि जय – लगेच या हं एक राउंड मारुन!...तनू भुकेला येते उशीर झाला तर!

जयेश : जशी आपली आज्ञा मॅडम! *(मोबाइल उचलून खिशात टाकतो. जातो.)*
*(क्षणभर शांतता.)*

राजन : हं – काय विचारणार होतीस?

मानसी : राजन, आधी शप्पथ घे खरं खरं सांगशील, अशी!

राजन : बाप रे – बरंच गंभीर प्रकरण दिसतंय!

मानसी : घेतोस ना शप्पथ? – तुझ्या बायकोची घे!

राजन : *(हसत)* खरं तर त्यासाठी तिची परवानगी हवी घ्यायला!...पण आत्तापुरतं चालेल! नीताची शप्पथ – खरं तेच सांगेन! खऱ्याशिवाय दुसरं काही –

मानसी : आम्हा दोघांशी – दोघांपैकी प्रत्येकाशी तुझी सारखीच मैत्री आहे?

राजन : हो!

मानसी : जयेशला तू अगदी जवळून ओळखतोस?

राजन : हे काय चालवलंयस कोर्टातल्यासारखं?

मानसी : हो की नाही?

राजन : ओळखतो. जयेशला-जवळून-ओळखतो! आता थोरल्या भावासारखा वगैरे म्हणू?

मानसी : नको. मला एवढंच सांग, जयच्या आयुष्यात कुणी मुलगी आलीये?

राजन : काहीतरीच काय, मानसी?

मानसी : तू शपथ घेतलीयेस खरं सांगण्याची!

राजन : मला तरी माहीत नाही अशी कोणी मुलगी! – कां? तुला कां आला संशय?

मानसी : मघा त्याच्या मोबाइलवर एक मेसेज आला होता – मला वाटलं काही तरी जोक वगैरे असेल, म्हणून मी वाचला, तर तो होता – 'थर्सडे, सिक्स थर्टी. खोजा हाऊस. शर्ली' असा.

राजन : शर्ली –?

मानसी : हो. तू ओळखतोस या शर्लीला?...निदान जयच्या तोंडून कधी हे नाव...

राजन : नाही बुवा...आणि तू पण हे सिरियसली नको घेऊ. मोबाइलवर हल्ली वाट्टेल ते मेसेजेस येतात....चेष्टामस्करी पण खूप चालते!

मानसी : *(काही क्षण गप्प. मग–)* राजन, तू ही सारवासारवी नाही ना करत – मित्राला वाचवण्यासाठी?

राजन : असं कां वाटतं तुला?

मानसी : कारण हा मेसेज चुकून आलेला नव्हता...तो जयसाठीच होता!

राजन : कशावरुन?

मानसी : कारण खूप दिवसांपूर्वी – जवळजवळ महिना झाला असेल – जयची पँट वॉशिंग मशिनमध्ये टाकण्याआधी मी तिचे खिसे रिकामे केले... त्यातल्या एकात एक बिल सापडलं. एकशे त्रेपन्न रुपयांचं. दोन बीअर आणि स्नॅक्स.

राजन : मग? त्यात काय झालं?

मानसी : बिल साध्याच चिटोऱ्यावर होतं. पण त्यावर रबर स्टॅम्प मारलेला होता, 'खोजा हाऊस' असा. मी ते विसरुन गेले होते... पण आज मेसेजमध्ये तेच नाव पाहिल्यावर... ही शर्ली कोण असेल राजन? आणि खोजा हाऊसमध्ये बीअर-स्नॅक्स मिळत असले – तरी ते नाव होटेलचं वाटत नाही...वाटतं-?

राजन : नाही...पण हे गौडबंगाल काय आहे, ते तू जयलाच का नाही विचारत?

मानसी : नाही राजन, मी असं काही विचारलं न् त्यात काहीच तथ्य नसलं, तर जय दुखावेल. आमचं फार प्रेम आहे एकमेकांवर. त्यात संशय घेणं बसत नाही. त्यातून काही सबस्टॅन्शिअल पुरावा मिळाला असता तर वेगळं – पण ही नावं – शर्ली...खोजा हाऊस...ही कधीच कशी नाही आली त्याच्या बोलण्यात?

राजन : काही कल्पना नाही. पण मला विचारशील तर – जोवर जयच्या प्रेमाची तुला खात्री आहे, तोवर असल्या नसत्या विचारांनी डोक्याचा चिवडा करुन घेण्यात काही अर्थ नाही....कितीतरी, चांगले सुरळीत चाललेले संसार अशा, नको त्या काळज्यांची कीड लागून...

मानसी : *(चिडून)* तुला म्हणायचंय्, की जोवर संसार सुरळीत चाललाय, तोवर काहीही वावगं वाटलं, तरी तिकडे डोळेझाक करावी?

राजन : बघ – संशयानं वाट लागते, म्हणतो, ते हेच! आत्तापर्यंत मजेत होतीस. संशय आल्याबरोबर लगेच झाली ना चिडचीड सुरु?... यापुढे अशाच शंका काढत राहिलीस, तर संसारातला सगळा आनंद गमावून बसशील...

मानसी : तसल्या आंधळया आनंदावर माझा विश्वास नाही, राजन. प्रश्न लांबणीवर

टाकला, की तो आपोआप सुटतो, यावरही नाही. बहुतेक प्रश्न वेळकाढूपणानं चिघळतात. म्हणून मला या प्रश्नाचं उत्तर आत्ताच मिळायला हवंय्!...आत्ताच जर का मला कळलं, की जयच्या आयुष्यात दुसरी कोणी मुलगी आली आहे –

राजन : – तर काय करशील?

मानसी : – कुठलीही सेन्सिबल बाई करील तेच. मी आदळआपट न करता सत्य पटवून घेईन. या घटकेला जयचं माझ्यावर प्रेम नाही – ते दुसऱ्या कुणावर तरी आहे, हा फॅक्ट अॅक्सेप्ट करीन. त्या दुसरीमुळं जय अधिक सुखी होणार असेल, तर मी त्याला मोकळं करीन... माझं जयवर प्रेम आहे, राजन. त्याच्यावर मालकी गाजवून तो दु:खी झालेला पाहण्यात मला आनंद नाही वाटणार!
*(क्षणभर शांतता. मग–)*

राजन : एक्स्क्यूज मी – आपल्या तिघांच्या अगदी गाढ मैत्रीचं लायसन्स घेऊन विचारतो – आर यू बोथ हॅपी इन बेड?

मानसी : *(चमकते. मग क्षणभरानं)* हॅपी इन बेड...निदान मी तरी समाधानी आहे. अतिशय. आणि तोही असावा... असं आत्तापर्यंत वाटत होतं. तशी खात्रीच होती!...पण आता – या क्षणी – काहीच सांगता येईनासं झालंय!...पण असं का विचारलंस? तुझ्याकडे – या संबंधात काही बोलला जय?

राजन : छट्. बिलकुल नाही. मी विचारलं ते अगदी सहज! आपली चर्चा चालली होती – म्हणून! बाकी त्याला कसलाच बेस नाही. तू काळजी नको करु! *(एकदम मोठमोठ्याने हसतो. पण ते काहीसे पोकळ.)* काय मानसी – फक्त एक मेसेज आणि एक चिटोरं...एवढ्यावरुन – मारे लांब चेहरे करुन कुठंच्या कुठं पोहोचलो आपण!...चल – पळतो मी...

मानसी : अरे पण, तुझा चहा –

राजन : फरगेट इट. तुझ्या या मूडमधे तुला काही करण्याची तसदी देत नाही मी. – निघतो.

मानसी : जयसाठी थांबत नाहीस?

राजन : उशीर होईल. तसं माझं काही खास काम नव्हतं. सहज डोकावलो!
चल – मी गेलो!

मानसी : तरीही असा घाईघाईनं पळ काढतोयस म्हणजे – राजन, तुला जयविषायी काहीतरी माहितेय न् ते तू लपवतोयस...असं तर नाही ना?

राजन : *(पुन्हा तसेच पोकळ हसून)* बघ...पुन्हा शंका! मला वाटतं, टीव्ही सिरियल्समधल्या पुरुषांची लफडी बघून तुझ्यादेखील मनावर परिणाम झालाय!...येतो मी. गुडनाइट! *(जातो.)*

*(मानसी काही काळ तशीच विचारात उभी. मग तिला काहीतरी सुचते. ती फोनशी जाते. जवळच्या छोट्या कपाटामधून टेलिफोन डिरेक्टरी काढते. पाने उलटते. एका पानाशी थांबते.)*

मानसी : *(वाचत)* खोजा...खोजा इब्राहिम...खोजा गेस्ट हाऊस...(विचारात पडते पुढे वाचते.) खोजा हाऊस...राइट. खोजा हाऊस!...दगडू नानाजी पथ...

प्रकाश मंदावत जातो.

---

## प्रवेश : २

'खोजा हाऊस' या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील पॅसेज. त्याला लागून काही खोल्या आहेत. वेळ दुपारची. चार-साडेचारचा सुमार. पॅसेजमध्ये वॉचमन बसलाय्. मानसी येते. तीन मजले चढून आल्यामुळे तिला थोडा दम लागलाय. वॉचमन तिला अडवतो.

वॉचमन : कुठं चालला?

मानसी : शर्लीला भेटायला.

वॉचमन : आता दुपारच्याला कुठं भेटणार ती? ती यायची संध्याकाळला...सहानंतर!

मानसी : खाली म्हणाले – चौथ्या मजल्यावर बघा!...इथंच राहाते ना ती?

वॉचमन : ऱ्हातबित नाय हो कोणी हितं. कामापुरत्या येत्यात – धंदा करत्यात न् जात्यात!

मानसी : म्हणजे... आणखीही मुली आहेत?

वॉचमन : रग्गड! पुषपा-राजलक्ष्मी-जिनी-पूर्णिमा-आलटून पालटून येत्यात धंद्यापुरत्या!...पण तुम्हाला काय पडलीये? तुमी चांगल्या घरातल्या दिसता! तुमी हितं आलाच कशाला? निघा. निघा तुमी.

*(मानसी पर्समधून एक दहाची नोट काढून त्याला देते. – आता तो बोलायला तयार!)*

मानसी : या पोरींचा धंदा म्हणजे ऽ...तोच ना?

वॉचमन : नाय तर काय?...तुमी खरंच अडाणी हायसा, का सोंग घेतलंय अडाणीपणाचं?

मानसी : नाही – खात्री करुन घेतली! ती शर्ली इथं येते – म्हणजे ती पण हाच धंदा करत असणार! – नाही का?

वॉचमन : तुमी कोण, शायडी बिआयडी तर नाय? ती शर्ली काय, पोलिसांना वॉन्टेड हाय का ? *(स्वत:कडे महत्त्व घेत)* काय चायपान्याचं ठरिवलंत तर सगळी डिट्टेल म्हायती काढून, खबर दीन!

मानसी : नको – डीटेल्स नकोत. मी पोलिसात नाही. मला फक्त एवढीच माहिती हवी होती....की इथं कुठली माणसं येतात?

वॉचमन : कुठली म्हंजे? रग्गड गिऱ्हाइकं येत्यात. आमी काय रजिस्टर नाय ठेवत. आन् ठेवून उपयोग काय? खरी नावं थोडीच देणारेय कोन? जो तो आपल्या अब्रूला सांभाळतो. आन् आमच्यासारखा माणूस एक वेळ खरं बोलेल...कारण आम्हाला नाय पडलेली एवढी अब्रूची. पण इथं येणारे ते सुटाबुटातले अब्रूदार साहेब – त्यांना खोटं बोलावंच लागतं... तुम्हाला काय, बरं नाय वाटत? – पानी देऊ?

मानसी : नको. ...जरा – चक्करल्यासारखं...

वॉचमन : बसा बसा.

मानसी : असू दे. ...जाईन मी.

वॉचमन : तुमच्यासारख्या चांगल्या बाईमाणसानं हितं, खरं तर, पायच नाय ठेवायला पायजेल –

*(मानसी एका, भान गेल्यासारख्या अवस्थेत, कठड्याला धरुन, पायऱ्या उतरु लागते. तिचे पाय लटपटताहेत...)*

प्रकाश मंदावत जातो.

---

## प्रवेश : ३

गायतोंड्यांचे घर.
संध्याकाळ होऊ लागलेली.
सैरभैर झालेली मानसी चावीने दरवाजा उघडून आत येते. पंखा लावते.
तिला खूप अशक्त वाटू लागलेय. आधाराआधाराने ती सोफ्यापर्यंत येते...आणि सोफ्यात अंग टाकते. काही वेळाने दाराची बेल वाजते. मानसी प्रसायाने उठते. दार उघडते.
तिची आई आत येते.

आई : *(थोडे धसकून)* मानसी –! अग, बरं नाहीये की काय तुला? बस, बस इथं. मधा वाटेतनं फोन केलास न् लगेच ये म्हणालीस – तेव्हाच वाटलं!...काय होतंय?

मानसी : काही नाही. आता बरं आहे!

आई : *(तिला ग्लासमध्ये पाणी ओतून देत)* घे. फॅन मोठा करते जरा. *(करते.)* असं काय झालं एकाएकी?

मानसी : आई...

आई : अग, असं काय करतेयस? – तनू बरी आहे ना? *(मानसी मान डोलावते.)* आणि जयेश –? *(मानसी 'बरा आहे' अशी खूण करते.)*

आई : ...आता कसं वाटतंय?

मानसी : बरं आहे. जरा धक्का बसल्यासारखं...

आई : कसला धक्का? जयेशनं ऑफिसात काही गडबड नाही ना केली? हल्ली मेले लाखांचे न् कोटींचे व्यवहार होतात उघड्यावर - कुणाची बुद्धी फिरली तर नवल नाही!

मानसी : नाही, तसलं काही नाही! *(ती आता पूर्ववत होऊ लागलेली.)*

आई : मग झालंय काय? जयची कोणाशी काही भानगड –

मानसी : ते – समजू शकले असते मी!

आई : हात्तेच्या – तेसुद्धा नाही?...म्हणजे कसलाच सिरियस प्रॉब्लेम नाही...चल, चहा करु का मी?

मानसी : नको आई, बस इथं. *(आई येऊन बसते. तिला जवळ घेते.)*

आई : हं – बोल आता.

मानसी : आई – आज मी – ती जागा पाहून आले...

आई : कुठली जागा?

मानसी : जिथं जय जातो ती. तिथं वेश्याव्यवसाय चालतो आई. हाय फाय, फॅशनेबल क्लब आहे – पण धंदा तोच!

आई : नेहमी जातो?

मानसी : आठवड्यातून दोनदा तरी जात असणार...जेव्हा, आज उशीर होईल, असं सांगतो, तेव्हा...

आई : फार उशीर करतो?

मानसी : नाही. आठ साडेआठपर्यंत येतो. ऑफिसच्या कामाचं निमित्त सांगतो...

आई : पिऊन नाही ना येत?

मानसी : नाही! *(एकदम चिडून)* तू अशी थंडपणे – पोलीस तपासणी काय चालवलीयेस?

आई : कारण मला जयेशची नाही – तुझ्या सुखाची काळजी वाटतेय्!

मानसी : *(रागातच)* मी सुखातच आहे – अगदी पूर्ण समाधानात आहे! माझा नवरा चिक्कार पैसे मिळवतो – माझ्यावर प्रेम करतो – घरी वेळेत येतो –बीअरशिवाय दुसरं काही पीत नाही – एकूण एक गोष्ट आदर्श नवऱ्यासारखी करतो!...तरीही हे– हे जे काही आहे – ते मला सहन होणार नाही, आई! अगदी – अजिबात नाही! *(शांतता. मग काही वेळाने –)*

आई : तू हे जे काही आहे म्हणतेयस ना – तो मोठासा प्रॉब्लेम नाहीये! म्हणजे बाकी सगळं ठीक असेल तर!...तो तुला सुख देतो ना?...म्हणजे आठवड्यातले त्याचे ते दोन दिवस सोडून दे...

मानसी : *(धक्का बसून.)* तू हे काय बोलतेयस, आई? – मला सुख दिलं, म्हणजे तो वेश्येकडे जायला मोकळा?

आई : तसं कोण म्हणतंय? त्याचं वागणं चूकच आहे – साफ चूक! पण आपण ते फारसं मनावर नाही घ्यायचं!

मानसी : *(आश्चर्याने)* मनावर घ्यायचं नाही –? कां?

आई : अग, ती पुरुषांची सवय असते!

मानसी : पुरुषांची सवय – असं म्हणून सोडून द्यायचं?... तू असतीस माझ्या जागी तर केलं असतंस दुर्लक्षा?

आई : – केलं! वीस वर्षं केलं! दोघी, तिघी तर मलाच माहीत होत्या – आणखीही फुटकळ ठिकाणी जात असतील! ही असली श्रीमंत ठिकाणं नसतील – मध्यम असतील! मी कुठं गेलेय् बघायला?... पण ब़्या ठिकाणी जात असतील! मी एकदोनदा उघड सांगितलं होतं – कुठं जाऊन शेण खायचं ते खा – पण कसला घाणेरडा रोगबिग घेऊन आलात, तर खबरदार! तुम्हांला उघड्यावर टाकून निघून जाईन पोरांना घेऊन!...तेव्हा तेवढं एक सांभाळा!

मानसी : मला...खरं वाटत नाही...आपले अण्णा....

आई : अग, सगळ्या घरांमधून असायचं. पूर्वी अंगवस्त्रं ठेवायचे. नंतर परवडेनासं झाल्यावर पुरुष या दुकानांमध्ये जायला लागले... घरच्या बायकांची काही चूक नसते यात! मी विचारलं का तुला, तू कुठं कमी पडतेयस का म्हणून? अनुभवावरुन सांगते. आपण काही कुठं कमी पडत नाही! पण यांचीच खाज! घरच्या जेवणानं ढेकरा येत असल्या, तरी हॉटेलात जाणारच! आपण बायका – आत्ताआत्तापर्यंत हॉटेलात तरी एवढ्या कुठं जात होतो?
*(काही क्षण शांतता.)*

मानसी : आई, सध्या तू एकटीच आहेस! दादा वेगळा झाल्यापासून घरही मोकळंच आहे! – मी कधी तनूला घेऊन तिथं येऊन राहिले, तर चालेल ना तुला?

आई : मुळीच नाही चालणार!...अग, तशीच मोठी आपत्ती कोसळली, तर घर तुझ्यासाठी नेहमीच उघडं आहे!...पण बारीकसारीक गोष्टी मनाला लावून घेऊन उगाच स्वत:चे न् त्या पोरीचे हाल करणार असलीस, तर साफ सांगून ठेवते – मी मुळीच तुला थारा द्यायची नाही!

मानसी : ठीक आहे. मग माझी सोय मीच पाहीन.

आई : अग, पण अशी काय अवदसा आठवलीये तुला?

*(दरवाजाला लॅच की लावल्याचा आवाज. मग दार उघडते आणि जयेश आत येतो. मानसी पर्स उचलून आत निघून जाते.)*

जयेश : *(उत्साहाने)* हल्लो आई! – व्हॉट अ नाइस सप्राईज! – कशा आहात तुम्ही?

आई : मी मजेत आहे! – तुम्ही कसे आहात? फार दगदग नाही ना करत? हल्ली जो पाहावं तो माणूस, प्रगती करायचीये, प्रगती करायचीये, म्हणून रात्रांदिवस श्रम करीत असतो! कोणाला बोलायला वेळ नाही – खायलाप्यायला फुरसत नाही – आराम करायला सवड नाही! थकून गेलेले असतात एकेकजण!...तुम्ही नका हो तसं करु!

जयेश : बिलकुल नाही! – मी मजेत राहणारा प्राणी आहे! काम बेताचं पण दर्जेदार करायचं, पैसा मिळवायचा पण त्याच्या पाठीमागे धावायचं नाही, आणि सुंदर आयुष्य जगायचं – असं माझं न् तुमच्या मुलीचं – दोघांचंही – धोरण आहे! काय कमी आहे सांगा आम्हाला? प्रेमाचा संसार – तनूसारखी गोड पोरगी...आणखी कसल्या प्रगतीच्या मागे धावायचं आम्ही?

आई : जे आहे ते नीट सांभाळा म्हणजे झालं! कुणाची दृष्ट नको लागायला!

जयेश : किती दिवसांनी आलात तुम्ही? जरा वरचेवर येत चला! – नाहीतर असंच करा, आता थोडे दिवस इकडेच या राहायला!

आई : नको ग बाई! सासूचं कौतुक ती लांब आहे तोवरच! (दोघेही हसतात. मानसी येते) आजसुद्धा आले ती मानसीला बरं नव्हतं, म्हणून!

जयेश : बरं नाहीये मानसीला? मानसी, काय होतंय?

आई : जरा चक्कर येत होती मघा तिला. आता बरी आहे. मी निघते. तुम्ही आहातच आता...आज जरा लौकर आलेले दिसताय्!

जयेश : का? मी आल्यानं व्यत्यय आला की काय तुमच्या गप्पात? *(हसतो.)* बसा, बसा. निघालात कुठे? आत्ता तनू येईल शाळेतून!

आई : आली की हट्ट धरुन बसेल, मी येते तिकडे म्हणून! त्याच्या आधीच पळते. अचानक आले हिनं बोलावलं म्हणून! हातातली कामं अर्धवट टाकलीय्त. जायला हवं. येते ग मानसी!

मानसी : बरं.

आई : *(जयेशला)* आता तुम्ही सांभाळा आपल्या बायकोला*!* मी गेले – *(*पर्स उचलून निघून जाते*.)*

जयेश : काय ग – आई फारशा एक्सायटेड दिसल्या नाहीत तुझ्या आजारानं! खरं म्हणजे

– चक्कर आली – आईंना बोलावून घेतलंस – आणि आता बरं आहे. याचा अर्थ... *(हसून)* स्पेशल आजार दिसतोय्! ॲम आय राइट?

*(ती काहीच बोलत नाही. तो नेहमीप्रमाणे आपल्या वस्तू उचलून जागेवर ठेवतो. बोलत राहातो...तो हे करीत असताना ती त्याच्याकडे न्याहाळून पाहात राहाते. हा माणूस पहिल्यांदाच भेटत असावा, तसे.)*

जयेश : व्हॉट अ ग्रॅंड सरप्राइज! – आणि तू हे जमवलंस कसं? गोळ्या घ्यायचं मुद्दाम थांबवलंस की एकच दिवस चुकून विसरलीस? – पण झाला तर झाला हा सुंदर अपघात! – यू नीड नॉट फील गिल्टी अबाउट इट! मुळात आपण अगदी एकच मूल हवं – मग मुलगी तर मुलगी – असं जरी ठरवलं असलं, तरी नाउ वुई कॅन अफोर्ड टू हॅव अनदर चाइल्ड – कान्ट वुई?...तनू आता चार वर्षांची होईल – तिच्या पाठीवर भाऊ झाला तर चांगलंच आहे... आपलं मग पर्फेक्ट चौकोनी कुटुंब होईल!- पण भाऊच व्हायला हवा हां! बहीण नाही चालायची! – तुला काय वाटतं?

मानसी : *(थंडपणे)* मला दिवस गेलेले नाहीत.

जयेश : काय सांगतेस?– सॉरी, माझा गैरसमज झाला! पण तुझी ही रोती सुरत – तुझी आई इथं आलेली...फॉल्स अलार्म! बट देन व्हॉटस् रॉंग विथ यू? – नो प्रॉब्लेम! आपण नंतर डॉक्टर रणदिव्यांकडे जाऊन तुझी तब्येत दाखवून येऊ – ओके?... *(थोडा अस्वस्थ)*. तू बोलत का नाहीयेस पण? – तुला खरंच झालंय काय? (ती काहीच बोलत नाही.) आज चहासुद्धा नाही केलास रोजच्यासारखा मी आल्याबरोबर!...तुला बरं नसेल तर मी करु का?

मानसी : तुला हवा असेल तर कर! – मला नकोय्!

जयेश : का? घशाशी येतंय का? – लगेच जाऊया का डॉक्टरकडे?

मानसी : प्लीज स्टॉप फसिंग अबाउट! – मला काहीही झालेलं नाहीये!
*(क्षणभर शांतता. मग–)*

जयेश : मघापासून बघतोय. तू माझ्याकडे अशी – नवख्या माणसाकडे पाहावं, तशी काय पाहातेयस?

मानसी : कारण आज तू मला नवखाच वाटतोयस.

जयेश : म्हणजे काय?

मानसी : म्हणजे मी ज्या जयला ओळखत होते – तो तू नाहीस! कदाचित् माझीच चूक झालेली असेल तुला ओळखण्यात!

जयेश : असं कां म्हणतेस?

मानसी : माझ्या माहितीतला जय माझ्याशी एकनिष्ठ होता!

जयेश : अजूनही आहेच! माझी कुठं भानगड नाही. लफडं नाही. मी कुणामध्ये गुंतलेलो नाही!

मानसी : फक्त मी आठवड्यातून दोनदा 'खोजा हाऊस'मध्ये जातो...

जयेश : *(चपापून)* खोजा... *(गप्पच होतो. काही सुचत नाही. क्षणभराने)* 'खोजा हाऊस'मधल्या प्रेसला आम्ही पेपर सप्लाय करतो...

मानसी : तू बहुतेक संपूर्ण खोटं बोलत नाहीयेस. कारण तिथं तळमजल्यावर खरोखरच एक प्रेस आहे!

जयेश : *(चमकून)* तुला काय माहीत!

मानसी : मी तिथं जाऊन आले. तळमजल्याच्या प्रेसमध्ये नाही. चौथ्या मजल्या- वरच्या ब्रॉथेलपर्यंत!

जयेश : *(थक्क.)* तू – चौथ्या मजल्यापर्यंत...पण...कशासाठी?

मानसी : सामान्य ज्ञान मिळवण्यासाठी. जे ज्ञान, एमेला फर्स्ट क्लासमधे येऊनही मला नव्हतं; त्याच्या शोधात. तू तिथं कोणाकडे जातोस? पुषपा, राजलक्ष्मी, की जिनी, की शर्ली? – की या सगळ्याच?

जयेश : आय डोन्ट वॉण्ट टु डिस्कस धिस विथ यू.

मानसी : राइट. त्यासाठीच तू मला आज अनोळखी वाटतोय्स. माझ्या ओळखीचा जय कुठलीही गोष्ट माझ्याशी डिस्कस करायला तयार असायचा. माझ्यापासून काहीच लपवत नसे.

जयेश : डॅम इट. तू आता प्रौढ झालीयेस मानसी. एका मुलीची आई आहेस तू! यू आर अ मॅच्युअर वुमन नाव. तुला एवढं कळायला हरकत नाही, की पुरुषाचे स्वत:चे असे काही पर्सनल एरियाज असतात...की जे त्याच्या बायकोला ठाऊक असायची गरज नसते.

मानसी : – पण ते त्याच्या मित्राला ठाऊक असू शकतात!

जयेश : मे बी!

मानसी : म्हणजे...तुझ्या काहीकाही गोष्टी माझ्यापेक्षा राजनला अधिक चांगल्या ठाऊक आहेत!

जयेश : शक्य आहे!

मानसी : आजच्या काळाची एक अत्यंत उपयुक्त भेट कुठली ठाऊकेय, जय? – आपली भाषा! ज्या ज्या बेशरमपणासाठी पूर्वी आपली मान लाजेनं खाली जायची, त्या प्रत्येकासाठी आज असे काही सुंदर शब्द सापडलेयत की ते आपली सगळी लाज झाकून, वर दुसऱ्याला अडाण्यात काढतात, थँक्स टू अमेरिकन मीडिया! ...पुरुषांचे

पर्सनल एरियाज – जे बायकोला माहीत असण्याची गरज नसते...त्यांना शुद्ध मराठीत, *(चिडून)* बाहेरख्यालीपणा असा एक लाजिरवाणा शब्द आहे – आणि शेण खाणं, असा गावठी वाक्प्रचार आहे! प्रत्येक बायकोला त्यांचा अर्थ चांगलाच कळतो...फक्त त्यांचा निर्लज्ज इंग्रजी अवतार कळण्यासाठी तिला मॅच्युरिटी लागते – तिचं माइन्ड ओपन लागतं आणि तिचे थॉट्स फ्रीडम-ओरिएंटेड असावे लागतात!

जयेश : मानसी, पुरुषानं पैसे देऊन एखाद्या स्त्रीकडे जाणं, तिथं थोडा वेळ जीव रमवणं यात काहीही गैर नाहीये! – इट्स प्रीटी कॉमन! नथिंग आउट ऑफ ऑर्डिनरी! मला नवल वाटतं मानसी, तुझ्यासारख्या बुद्धिमान, करियरिस्ट बाईला हे स्वीकारणं इतकं कठीण जावं की...

मानसी : यांच्याशी बुद्धीचा आणि करिअरचा काहीही संबंध नाहीये, जय. जगातल्या कुठल्याही स्त्रीला – अगदी हिलरी क्लिंटनलासुद्धा आपल्या नवऱ्याच्या स्वैराचाराचा त्रासच होतो! कारण त्या गोष्टीचा संबंध स्त्रीच्या शिक्षणाशी, व्यवसायाशी, फार काय, संस्कारांशीसुद्धा नाहीये – तो आहे तिच्या मूलभूत मानवी भावनांशी!...त्या बदलल्या तर ती स्त्री, स्त्रीच राहाणार नाही!

जयेश : आणि कितीतरी पुढारलेल्या बायका स्वत:च पुरुषावेश्यांकडे जातात, गिगोलोज ठेवतात, मेल स्ट्रिप्टीज क्लबमध्ये जातात, त्यांना तू काय म्हणशील?

मानसी : मी म्हणेन, की त्या तुझ्यासारख्या पुरुषांची बरोबरी करायला पाहताहेत. कारण पुरुष वेश्येकडे जाणार, यात गैर काही नाही, हे तत्त्व समाजानं मान्य केलंय!...तुझ्या मित्रानं मान्य केलंय्!...माझ्या आईनं मान्य केलंय्!

जयेश : *(धसकून)* तू – बोललीस आईंशी?

मानसी : हो. हे बोलण्यासाठीच आई असते. मुलीचा असा कुठलाच पर्सनल एरिया नसतो, की जो समजण्याची आईला गरज नाही!

जयेश : तरीही तू हे त्यांच्याकडे बोलायला नको होतं. त्यांना धक्का बसला असेल!

मानसी : मुळीच नाही. ती म्हणाली, पुरुषाला अशी खाज असतेच! – त्याच्या बायकोनं त्याला कितीही दिलं, तरी मिळेल तिथून आणखी ओरबाडण्यासाठी तो भुकेलेला असतो.

जयेश : बघ, आईंना तुझ्यापेक्षा अधिक समज आहे!

मानसी : कारण ती प्रश्न विचारीत नाही. मी विचारणार!...आजवर स्त्रीनं पुरुषाच्या भुकेचं कौतुक केलं, तिला मर्दानगी मानलं! का? तर पुरुषानंच तिला तसं करायला शिकवलं म्हणून! – बट सॉरी जय – मी हे कौतुक करणार नाही! केव्हाही नाही! तुझा बाहेरख्यालीपणा मी स्वीकारणार नाही! कुठल्याही परिस्थितीत नाही!

जयेश : तू उगाचच आकांडतांडव करतेयस!

मानसी : नवऱ्याची लफडी कळल्यानंतर प्रत्येकच बाई करते तसं आकांडतांडव मी करीत नाहीये, जय. माझी त्यामागे काहीएक निश्चित धारणा आहे. केवळ भावनेच्या भरात मी बोलत नाहीये. मी या गोष्टीवर नेहमीच विचार करीत आलेय. ...जय, पुरुषांची गरज मी समजू शकते. ज्यांचं लग्न होऊ शकत नाही, ज्यांच्या बायका आजारी आहेत, बाहेरगावी आहेत, त्यांना वेश्यांचा आधार असतो. परिस्थितीपोटी, दहशतीपोटी ज्यांना हा धंदा करणं भाग पडतं, त्या बायकांची मजबुरीदेखील मी समजू शकते. पण ज्यांच्या बायका त्यांना भरपूर समाधान देताहेत, त्यांनी केवळ चैन म्हणून, चंगळ म्हणून, वेश्यागमन करणं हे मी अनैतिक मानते.

जयेश : यात कसलं आलंय नैतिक-अनैतिक? आमच्या ऑफिसमध्ये कितीतरी लोक, माझे कितीतरी मित्रा, सर्रास बायकांकडे जातात. कामं होण्यासाठी लोक अधिकाऱ्यांना खाण्यापिण्याबरोबर पोरीसुद्धा पुरवतात आणि ते त्या आनंदानं स्वीकारतात. वरच्या सर्कलमध्ये ही गोष्ट राजरोसपणे मान्य झालेली आहे. तूच मात्रा टिपिकल मध्यमवर्गीय मराठी बाईसारखी नीतीअनीतीचा काथ्याकूट -

मानसी : – तू मला मध्यमवर्गीय म्हण, की आणखी काही...पण यानंतर मी तुझ्याबरोबर राहू शकणार नाही!

जयेश : *(धक्का बसून)* मानसी...?

मानसी : होय जय, मी तुला सोडून जायचं ठरवलंय, आजच्या आज...!

जयेश : हे अति होतंय, मानसी!

मानसी : जय – तू ‘खोजा हाऊस’मधे जातोस हे कळल्यावर मला धक्का बसलाच, पण त्याहीपेक्षा मोठा धक्का बसला तो तुझ्याशी बोलल्या- नंतर! ज्या नैतिकतेवर मी आपला संसार उभा आहे असं मानत आले, ती तू इतकी कॅज्युअली घेतोस?...एखाद्या स्त्रीचा वस्तूसारखा वापर करणं, याला तू जीव रमवणं म्हणतोस?...त्यासाठी चंगळवेडानं किडलेल्या भ्रष्ट हायफाय समाजाची उदाहरणं देतोस? तू नक्की – नक्की मी तुला आजवर समजत आले, तो जय नाहीस! यू आर अ टोटल स्ट्रेंजर टु मी!...अशा अनोळखी माणसाशी मी संसार कशी करु?...थोड्या वेळानं, जरुरीपुरतं सामान भरुन मी घरातून निघून जाईन. तनू शाळेतून आली, की तिला घेऊन!

जयेश : हे बघ, उगाच डोक्यात राख घालू नकोस. तुला पाहिजे तर उद्यापासून मी नाही जाणार तिकडे – कधीच नाही जाणार – बस्?

मानसी : ‘मला पाहिजे म्हणून’–‘मी म्हणते म्हणून’–‘मी घर सोडू नये म्हणून...’ पण तुला – तुला स्वत:ला काय वाटतं? *(तो गप्पच. मग-)* आता एक सांगते – ते नीट

ऐक. मघापासून मी खूप बोलले. कॉलेजात शिकवण्याच्या सवयीनं जरा जास्तच बोलले. तरी म्हणायचं होतं, ते राहूनच गेलं. मी एकूण पुरुषांविषयी बोलले...मला एकट्या तुझ्याविषयी काहीतरी म्हणायचं होतं...*(सावकाश, विचार करुन)* याआधी माझी खात्री होती, की तू माझ्यावर अंतर्बाह्या प्रेम करतोस. माझ्यावर आणि माझ्यावरच!

जयेश : एक्झॅक्टली. मी खरं प्रेम करतो – ते तुझ्यावर आणि तुझ्यावरच. अग, हे जे काही चालतं ती नुसती शरीराची चैन! प्रेमासारख्या पवित्रा भावनेला त्यात जागा नसते. ...म्हणून तर मला कधी वाटलं नाही, की मी तुला फसवतोय! मी जर एखादीवर खरोखरच प्रेम केलं असतं ना, तर ती तुझी फसवणूक झाली असती! पण नुसता शरीरसंबंध – डॅम इट, तो फक्त तात्पुरता असतो! ...शॉवर घेतला की धुवून जाणारा...तो प्रेमासारखा कायम थोडाच टिकतो?

मानसी : ...प्रेम तरी कुठं कायम टिकतं? – पण मी तुझ्यासारखी, मन आणि शरीर यांची फारकत नाही करु शकत. तू म्हणतोस त्या, मन नसताना केलेल्या शृंगारात तुला गंमत वाटत असेल – पण मला किळस वाटते! जय – प्रेमाशिवाय नुसत्या शरीरानं शृंगार करुन तू स्वत:ला तर बाटवलंसच – पण त्याच शरीरानं माझ्याशीही शृंगार करुन मलाही अपवित्रा केलंस!

जयेश : बुलशिट! – तू कशी अपवित्रा होशील? ही नुसती तुझ्या मनाची भावना आहे! प्रत्यक्षात तिला काही अर्थ नाही! माझ्या बाहेरच्या वागण्याशी तुझ्या शरीराचा संबंध काय?

मानसी : आहे – मला जाणवतो तो...मी तुला कधीच क्षमा करु शकणार नाही, जय.

*(दोघे क्षणभर एकमेकांकडे पाहात राहातात...एक निर्णायक क्षण.*
*मग बाहेरुन हाका ऐकू येतात : आ ऽ ई ऽऽ - आईऽ!*
*त्याबरोबर दारावर धक्के.*
*जयेश एकदम परिस्थितीची जाणीव होऊन असहाय्यपणे मानसीकडे पाहतो.)*

मानसी : आले बाळा, आले ऽऽ!

*(जयेशकडे एक नजर टाकते आणि दार उघडायला जाते. तो तिला नजरेनेच काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करीत राहतो.)*

प्रकाश मंदावत जाऊन पूर्ण अंधार होतो...

---

## प्रवेश : ४

मानसीची पंजाबी मैत्रीण गुरमीत कौर हिचे घर.
दारावरची बेल वाजते. घरातला वरकामाचा पोरगा जाऊन दार उघडतो. आई आत येते.

आई : *(पोराला)* कोणी आहे का रे घरात?...गुरमीत –? *(पोरगा : नाही.)* आमची ही तरी आहे का?– मानसी?
*(पोरगा 'हां' म्हणून जाऊ लागतो.)*

आई : थांब जरा *(पिशवीतून डबा काढून देते.)*. हा एवढा सांभाळून किचनमध्ये ठेव - आणि मानसीला सांग, मी आलेय् म्हणून!

*(पोरगा मान डोलावून जातो. आई आत येऊन बसते...काही वेळाने, मानसी बाहेर येते.)*

मानसी : आई–!

आई : अगं, पुरणपोळया केल्या होत्या त्या घेऊन आले. तुला न गुरमीतला, दोघींना दोन वेळा पुरतील!

मानसी : तुला काय आई, मी इथं रानात पडलेय असं वाटतं? मी, तनू न गुरमीत मज्जा मज्जा करीत असतो...काय काय गंमतीदार पदार्थ करुन खात असतो. परवा तर गुरमीतनं कारल्याचा हलवा केला होता! तिच्याकडनं इतक्या पंजाबी डिशेस शिकले मी!

आई : तशा तुम्ही काही उपाशी राहणार नाही, माहितेय मला!...पण तीन महिन्यांपासनं तू घरापासून वेगळी झालीयेस, म्हणून जीव तुटतो माझा!...निदान माझ्याकडे तरी चल! – तेव्हा येऊ नकोस म्हटलं, तेच धरुन बसलीस! मी कशासाठी म्हटलं होतं? – तू स्वत:चं घर सोडू नयेस म्हणून!

मानसी : – ते मला कळत का नाही, आई?

आई : कळतं तर येत का नाहीस घरी?

मानसी : अग, तुला कशाला या वयात आणखी आमची दगदग? आणि मी समोर असले की, एकसारखं तुझ्या मनात येणार...ही घर सोडून आली...! मग तू टिपं गाळणार - हळूहळू मी न् तनूदेखील मुळुबाई रडूबाई होणार...हवंय कशाला ते? त्यापेक्षा इथंच बरंय्. गुरमीतलाही माझी सोबत झाली – आणि मलाही ती रोल मॉडेल! अशी डॅशिंग आहे बेटी! न्यूज चॅनेलवर काम करते ना, तिथं भल्याभल्यांची उतरवून ठेवते!...तनूनं तिच्यासारखं व्हायला हवं!

आई : कशाला?...पुढं उभा जन्म एकटीनं काढायला?

मानसी : दुकटीच्या संसाराचे बघतेयस ना धिंडवडे?

आई : धिंडवडे तू स्वत:च काढून घेतलेय्स! नाहीतर एवढा चांगला सोन्यासारखा संसार सोडायचं तुला काय कारण होतं?

मानसी : तुला कारण माहितेय, पण ते पुरेसं वाटत नाही, त्याला मी काय करु?

आई : जयेश चांगला आहे गऽ – तुझ्यावर प्रेमसुद्धा आहे त्याचं!

मानसी : आई, नवरा चांगला – संसार चांगला, म्हणजे काय? रोजच्या व्यवहारातल्या सुखसोयींची खात्री – एवढंच ना?...ठीक आहे. मी सुखात होते!– पण आता – ही गोष्ट कळल्यानंतर मी त्या माणसाबरोबर सुखात राहू शकत नाही – त्याचं काय?

आई : – हट्टी आहेस!

मानसी : मला तुझं नवल वाटतं, आई...त्या दिवशी, मी तुला ही गोष्ट सांगितल्यावर तू माझं सांत्वन केलंस – पण जयला एका अक्षारानं बोलली नाहीस. उलट त्याच्याशी नेहमीसारखंच वागलीस – हास्य- विनोद केलेस! त्यानंतरही तू त्याला एकदोनदा फोन केलेस, त्याची चौकशी केलीस...त्याच्या या घाणेरड्या सवयीसाठी त्याच्याशी कायमचा संबंध तोडावा, त्याच्यावर बहिष्कार टाकावा, असं नाही वाटलं तुला?

आई : बहिष्कार?– काय म्हणून?

मानसी : त्याच्या मनाच्या आजारासाठी. या विकृतीचं समाजानं कौतुक केलं नसतं, तर आज हा आजार घरोघरी फैलावला नसता!...तुला, आई खरंच वाटत नाही का, की घरात चांगली बायको असताना बाहेरचे उकिरडे शोधत फिरणाऱ्या माणसाचा तिरस्कार वाटायला हवा?

आई : अग, बाहेरच बाहेर! – ते घरात आलं नाही, म्हणजे झालं!...दृष्टीआड सृष्टी!

मानसी : बायकांना दृष्टीआड काहीही घडलेलं चालतं, म्हणून तर फसवा- फसवी करुन पुरुषांचं भागतं!

आई : बाकी सगळं राहू दे. पण एवढा मन लावून उभारलेला संसार तडकाफडकी सोडून दिलास –!

मानसी : त्यात काय, दुसरा उभारीन! थोडे पैसे जमले, की भाड्याच्या चांगल्या जागेत जाईन! ...आई, माझा साडेसहा वर्षांचा संसार गेल्याचं तुला एवढं वाटतं – मग मी जन्मापासून एकेक करुन जमवलेली तत्त्वं, माझी मूल्यं, माझ्या निष्ठा...ही सोडून दिलेली कशी चालतील?

आई : – त्या बाळजीवाला त्याचा बाप अंतरला – हे कोणत्या तत्त्वात बसतं?

मानसी : ...आता हे तुझं इमोशनल ब्लॅकमेलिंग! पण तनूसाठी मी परत गेले तर मोठी झाल्यावर तीच मला विचारील, की तू हे का चालवून घेतलंस? मग मी काय उत्तर देऊ?...तू अण्णांना का सोडलं नाहीस, आई?...तुमची पिढी अशी ड्रॅस्टिक स्टेप घेऊ शकली असती न् पुरुषांना सवलती देत राहिली नसती तर आमची पिढी –

आई : – कदाचित पुरुषांशिवायच राहायला लागली असती!...म्हणजे वेगळं काय, आत्ता चाललंय् तेच की ! *(दोघीही हसतात.)*

*(दारावरची बेल वाजते. पोरगा दार उघडून आत जातो. राजन आत येतो. त्याच्या हातात एक बॅग.)*

मानसी : राजन, किती दिवसांनी दिसतोयस! आणि बॅग कसली?

राजन : तुझ्या काही साड्याबिड्या आहेत यात. जय म्हणाला, देऊन ये. तिला लागतील...तीन महिने होऊन गेले – आता काही ती परत येत नाही!

मानसी : म्हणजे?– मी कधी काळी परत येईन, अशी आशा होती की काय त्याला?

राजन : आम्हांला सगळयांनाच होती. सगळ्या मित्रांना!

मानसी : बरोबर आहे...ते ज्या गोष्टींना गंमत समजतात, ती गोष्ट मला मूलभूत महत्त्वाची वाटते, यासाठी मूर्खच मानत असणार ते मला!

आई : आता पुन्हा नको तो वाद काढू.

मानसी : का नको काढू? हा काय माणूस आहे? – तीन महिन्यांनी भेटतोय मला – तेदेखील जयनं काम सांगितलं म्हणून!...याची म्हणे आम्हा दोघांशीही सारखीच मैत्री होती! – वेळ आल्यावर मात्रा हा जयच्याच पाठीशी उभा राहिला!– चूक जयची असताना! तीन महिन्यांत माझी चौकशीसुद्धा केली नाही यानं!

राजन : मी आईंना विचारीत असे. तुझी बित्तंबातमी कळायची मला त्यांच्याकडून! पण इथं कुठं येणार मी – त्या पंजाबणीकडे?

आई : तू काय घेतोस तिचं मनावर? – सध्या ती सगळ्या जगावरच चिडलीये.

राजन : तनू कुठं?

मानसी : डे-केअरमध्ये. इथं अगदी छान मायाळू बाई भेटलीये तिला. शिवाय शाळेची बस आहेच!

राजन : ही मोटर तिच्यासाठी. *(मानसीला बॉक्स देतो.)* तिला म्हणावं पंपंमध्ये बसून घरी जाऊन ये!

मानसी : असलं काहीतरी नाही हं मी सांगणार! ...शिवाय हेसुद्धा घरच आहे की तिचं! गुरमीतचं न् तिचं छान जमतं. गोष्टी काय, गाणी काय – धमाल करत असतात दोघी. तिचं ऐकून ही आता पंजाबीसुद्धा बोलायला लागलीये...‘मै चंगी कुडी हूँ’, ‘त्वोडा की हाल’ ‘खाण वास्ते दो’ असलं काय काय...*(तिघेही हसतात.)*

राजन : डॅडींची आठवण काढते की नाही?

मानसी : कुसकटासारखे प्रश्न विचारु नकोस! *(राजन हसतो.)* काढते आठवण मधूनमधून...पण होईल सवय हळूहळू!

राजन : तिला होईल. पण तुला होईल का?

मानसी : प्रयत्नांनी जमतं सगळं. मी जमवीन.

आई : आणि जयेश तरी कुठं आले रे इथं? मी एकदोन वेळा फोन केला होता... तेव्हा मारे माझ्याकडून इथला पत्ताबित्ता लिहून घेतला; पण आले नाहीत न् काही नाही!...मला तर सुरुवातीला आशा होती, की ते येतील, हिची समजूत काढतील न् घेऊन जातील हिला घरी!

राजन : *(हसून)* हिची समजूत – आणि जय काढणार!...आणि ही त्याचं ऐकून घेणार!– आई ...ओळखत नाही तुम्ही आपल्या मुलीला अजून!

आई : माझ्या मुलीवर सगळा दोषा! – तुझा मित्रा शिष्ट आहे ते सांगत नाहीस!

राजन : शिष्ट कुठला? उलट सुरुवातीला तो जरा शरमिंदाच झाला होता! – एक दिवस ही परत येईल, अशी आशाही होतीच! पण तसं काहीच झालं नाही!...मग गेल्या महिन्यात मला म्हणाला, यायला पाहिजे एकदा जाऊन!

आई : खरं सांगतोस?

राजन : तुमची शप्पथ...पण तेवढ्यात त्याला झाला न्युमोनिया. खूप सीरियस होता...हॉस्पिटलमध्ये होता पाच दिवस!

आई : बाई- ! आम्हाला नाही सांगायचं?

राजन : सांगणार होतो. पण जयनंच सांगू दिलं नाही. म्हणाला, होईन मी बरा. त्यांना कशाला उगाच त्रास?

आई : त्रास? ...म्हणजे आम्ही अगदी परकेच झालो, म्हणायचं....आणि त्याचं सगळं करायचं कोण?

राजन : तशी कामाची माणसं होतीच. शिवाय मी होतो हॉस्पिटलमधे जाऊन येऊन! ...आता कम्प्लीट बरा आहे! ऑफिसातसुद्धा जायला लागला! ...अशक्तपणा आहे मात्रा!

मानसी : फार अशक्त झालाय का?

आई : तू स्वतःच का नाही बघून येत?

राजन : आयडिया! – आत्ता येतेस माझ्याबरोबर?

मानसी : का? – जयला सांगून आलायस वाटतं, घेऊन येतो म्हणून?

आई : हे काय ग तुझं बोलणं?

मानसी : मग काय?...मी याच्याबरोबर कशाला जाऊ?...त्या घराचा पत्ता काय मला ठाऊक नाही? जायचं असेल तर मी एकटी जाऊ शकते!

आई : जायची तशी जा. – जा, म्हणजे झालं! *(राजनला)* बस. काहीतरी आणते सरबत

वगैरे. *(जाते.)*

*(काही क्षण शांतता. मग –)*

राजन : अगदी निश्चयच केलायस का तिथं पाऊल न ठेवण्याचा?

मानसी : असं काही नाही! ...मनात आलं, तर येईनही त्याला बघून!

राजन : म्हणजे तेवढ्यापुरती येशील!

मानसी : हो – नाही तर कशाला?

राजन : तुला कल्पना नाही. हॉस्पिटलमध्ये तापाच्या गुंगीत एकसारखं तुझंच नाव घ्यायचा?

मानसी : एकट्या माझंच?

राजन : असं काय तिढं बोलतेस? – त्याचं तुझ्यावर किती प्रेम आहे, हे काय तुला माहीत नाही?

मानसी : तू त्याचीच वकिली करणार!...आता तरी कबूल कर – तेव्हा खोटी शपथ घेतलीस! – जय असल्या ठिकाणी जातो – रेग्युलरली जातो – हे तुला ठाऊक होतं!

राजन : मानसी, चाळीस टक्के संसारी पुरुष कधी ना कधी अशा ठिकाणी जातात किंवा कोणाकोणाशी संबंध ठेवतात. आणखी वीस टक्क्यांची इच्छा असते, पण त्यांना मार्ग नसतो. जे नेहमी जातात, त्यांच्या मित्रांना ते माहीत असतं; पण ते त्यांच्या बायकांना सांगायला जात नाहीत...

मानसी : का?

राजन : एकतर हे पुरुषापुरुषांमधलं सीक्रेट असतं. पुरुष आपल्या शरीराविषायी आपापसात खूप बोलतात – त्यातून ते तयार झालेलं असतं! पुरुष आपल्या खाजगी गोष्टी विश्वासानं मित्राला सांगतो – तो त्या कधीच कुणालाही सांगणार नाही – आपला विश्वासघात करणार नाही – या भरंवशावर!...शिवाय – मित्राचा सुरळीत चाललेला संसार मोडायचं पाप कुणाला ओढवून घ्यायचं नसतं...

मानसी : संसार मोडू नये म्हणून लपवाछपवी करायची...मित्राचा स्वैराचार माहीत असताना त्याच्या बायकोला अंधारात ठेवायचं – हे अनैतिक आहे, असं नाही तुला वाटत?

राजन : मुळात हा स्त्रीच्या आणि पुरुषाच्या नजरेतलाच फरक आहे, मानसी. आपला मित्रा स्वैराचारी आहे – याचा कुठलाच पुरुष कधी बाऊ करत नाही. कारण प्रत्येकच पुरुषाच्या मनात परस्त्रीविषयी आकर्षण असतं. तिची अभिलाषा नसेल, पण आकर्षण जरुर असतं... त्यातल्या काहींना संधी मिळते. काहींना नाही मिळत. पण हे सगळं अनैतिक आहे...असं, जसं एखाद्या स्त्रीला वाटेल, तसं पुरुषांना नाही

वाटत!

मानसी : कुणालाच नाही? – अगदी तुझ्यासारख्या सज्जन पुरुषाला...सुद्धा?

राजन : *(हसून)* एवढं सगळं ऐकल्यानंतर – माझ्या तरी सज्जनतेची गॅरंटी तू कशी देतेस?

*(आई सरबत आणि पुरणपोळी घेऊन येते.)*

आई : *(राजनला)* घे.

राजन : हे काय? – आत्ता आत जाऊन पुरणपोळी केलीत?

आई : खवचटपणा समजतो मला. *(तो हसतो.)* पण गरम करीत बसले तव्यावर, म्हणून उशीर झाला!...मात्रा केलीये मीच, बरं का! *(जाते.)*

राजन : मानसी, सांगितलं ते सगळंच तुला पटेल, असं नाही. पटणार नाही, ते सोडून दे. पण या सगळ्या नीती-अनीतीच्या गोंधळात एक गोष्ट मात्रा खरी...जयेशचं तुझ्यावरचं प्रेम!...

मानसी : नैतिकतेप्रमाणे प्रेमाचीही व्याख्या प्रत्येकाची वेगवेगळी असते, राजन. बहुतेक वेळी, ती स्वत:च तयार केलेली असते. स्वत:च्या सोयीनं.

राजन : विचार कर. अजूनही तुमचा संसार मोडू नये असंच मला वाटतं. तसं वाटणं अनैतिक वगैरे असेल तर त्यासाठी माफी चाहतो.

मानसी : *(हसून)* ठीक आहे – करुन टाकलं मी तुला माफ!

राजन : मग –? जयला बघायला कधी जातेस?

मानसी : आता बरा आहे ना तो? मग सावकाशीनं जाईन कधीतरी. जाईन एवढं नक्की!

राजन : – नक्की?

मानसी : नक्की!

प्रकाश झपकन मंदावतो. अंधार.

---

## प्रवेश : ५

गायतोंड्यांचे घर. संध्याकाळ.
जयेश फोनवर बोलतोय. तो अत्यंत अस्वस्थ – टेन्स आहे...त्यातून त्याला भलतीच सर्दी झालीये. नाक गळतेय. डोळे गळताहेत...त्यामुळे तो अधिकच चिडचिडा झालाय.

जयेश : माझा रिपोर्ट पाठवणार होता तुम्ही. नाही, एरवी पेशंटशिवाय दुसऱ्या कुणाला देत नाहीत हे माहितेय मला. पण डॉक्टर क्षीरसागर माझे जवळचे मित्रा आहेत...डॉक्टर क्षी-र-सागर!...ते – ॲज अ स्पेशल केस, घरी पाठवणार

होते!...आज पाचपर्यंत – पाच! – आता साडेसहा होऊन गेले...बघा ना – बघा –
*(दारावरची बेल वाजते. जयेश फोन कानाला लावूनच दार उघडतो. राजन आत येतो.)*
...पाठवला? किती वेळापूर्वी निघाला शिपाई?– मग एव्हाना यायला हवा होता! ...असं कसं करता? दीड तास उशीर म्हणजे – इकडे वाट पाहता पाहता खलास होईल माणूस!...ओके. मी वाट पाहतो... थँक्यू, व्हेरी मच. हां हां...गुडनाइट!
*(फोन ठेवतो. शिंकतो.)*
सॉरी – भयंकर सर्दी झालीये मला!

राजन : कोणाची वाट पाहतोयस?

जयेश : लॅबचा शिपाई रिपोर्ट घेऊन यायचाय, त्याची.

राजन : कसला रिपोर्ट?

जयेश : *(शिंकत)* सॉरी – तुला माहीतच नाही, नाही का? ...विसरलो होतो. मी सांगितलं नाही तुला...अरे, आपला तो डॉक्टर भरुचा – वेडा पारशी आहे तो...मी न्युमोनियातनं बरा झालो न् ऑफिसला जाण्यासाठी फिटनेस सर्टिफिकेट घ्यायला गेलो...तर या वेड्यानं मला काय सांगावं?

राजन : काय सांगितलं?

जयेश : म्हणतो – प्लीज – एक काम करशो? जरा तमारी एच. आय. व्ही. टेस्ट करी नाखो...

राजन : *(ताडकन उठून)* एच. आय. व्ही. टेस्ट?

जयेश : मी म्हटलं, कशासाठी? मला एकदम फिट वाटतंय् *(शिंकतो. रुमालात नाक शिंकरतो.)*. तरी तो येडा इन्सिस्ट करतच राहिला... मग म्हटलं, ओके - करी नाखो, तर करुन टाको. तेवढंच आपलंही समाधान चेकअप केलं म्हणून....बाकी काही नाही...

राजन : त्या टेस्टचा रिपोर्ट मिळायचाय आज?

जयेश : हो – आठ दिवसांपूर्वी टेस्ट दिली...आणि मन कसं वेडं असतं बघ. – साला आपल्याला काहीही झालेलं नाहीये, हे माहीत असतानासुद्धा, त्या दिवसापासून मनानं भयंकर टेन्शन घेतलंय! रात्री झोपेतून जागं व्हायला होतं दचकून! – नंतर झोपच लागत नाही! काहीतरी वाईट- साईट यायला लागतं डोक्यात!
*(रुमालात नाक शिंकरतो.)*

राजन : उगाच घाबरलास तू!

जयेश : मधे साला तो न्युमोनिया झाला ना, तेव्हापासून सगळं अपसेटच होऊन गेलंय *(शिंकतो.)*. परवा ऑफिसमध्ये डॉक्टर वाडियांचं लेक्चर होतं या

विषायावर...विथ स्लाइडस! का कोण जाणे, मला बसवेनाच तिथं – सरळ निघून आलो मी मागच्या मागेच!...श्या! एकदम डोक्याचा कचरा झालाय!...कुठनं त्या येड्या पारशाचं ऐकलं न् टेस्ट दिली असं झालंय! *(चिडून)* शी! हा लॅबचा शिपाई गेला कुठे? पाचच्या आधी रिपोर्ट तयार आहे आणि हा अजून –

राजन : *(अचानक)* जय – तू त्या पोरींकडे जातोस तेव्हा...कंडोम वापरतोस ना?

जयेश : गरज नाहीये रे त्याची. 'खोजा हाऊस' मधल्या पोरी म्हणजे – एकदम टॉप्स! सगळ्या एकदम टेरिफिक फॉर्ममध्ये – कोणाला कधी सर्दीपडसंसुद्धा नाही! अरे, म्हणून तर तो जॉइंट एवढा महागडा आहे! एकदम क्लीन!

राजन : तू माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही दिलंस. – कंडोम वापरतोस, की नाही?

जयेश : होय रे बाबा – नेहमी वापरतो. म्हणजे आता – आजारपणानंतर तिकडे गेलोच नाहीये. पण आधी जायचो, तेव्हा अगदी लक्षात ठेवून वापरायचो. माझा ब्रँडसुद्धा ठरलेला आहे! केमिस्टकडे गेलो, की तो न मागता समोर टाकतो. *(शिंकतो.)*

राजन : एवढं आहे...तर तुला घाबरायचं कारणच नाही!

जयेश : तसं कारण नाहीच आहे रे – पण माणूस आहे; चूक होते...एखाद्या घाईच्या वेळी नसेलही वापरला, तर आपल्या काय लक्षात राहणार? म्हणजे तसं झालंच असेल, असं नाही – पण मनात उगाच शंका येत राहातात!...म्हणा, आता वेटिंग पिरियड इज निअरली ओव्हर! आता कुठल्याही क्षणी रिपोर्ट येईल – मग सगळ्या शंकाबिंका बाद! *(शिंकतो.)* एकदा रिपोर्ट आला ना, की वुइल सेलिब्रेट इट! वुइल सेलिब्रेट माय एस्केप विथ शॅम्पेन! *(त्याला टाळी देतो.)*
*(दारावरची बेल वाजते. जयेशला एकदम भीतीचा झटका येतो.)*

जयेश : *(आवाजात कंप.)* राजऽन!

राजन : घाबरु नकोस. एव्हरीथिंग विल बी फाइन. तू बस जागेवर. मी उघडतो दार!

*(जयेश खाली बसतो. पुन्हा अस्वस्थपणे उठून उभा राहतो. हातातली अंगठी, गळ्यातला ताईत यांना पुन्हा पुन्हा स्पर्श करतो. डोळे मिटतो...काहीतरी पुटपुटतो...*
*दरम्यान, राजन जाऊन दार उघडतो. मानसी आत येते.)*

जयेश : (रिपोर्ट घ्यायला पुढे केलेला हात तसाच ठेवून डोळे उघडतो. मानसीला पाहून-) तू?

मानसी : *(बराच वेळ त्याच्याकडे पाहात राहते.)* बराच वाळलायस.

राजन : बस मानसी!

जयेश : तू...परत आलीस?

मानसी : नाही. यानं सांगितलं, तुला न्युमोनिया झाला होता!...म्हणून कसा आहेस ते बघायला आले!

जयेश : आता एकदम – फिट आहे मी! थोडा अशक्तपणा आहे...तो जाईल!
*(त्याला एकदम एकापाठोपाठ एक शिंका येतात.)*

जयेश : एक् – एक् – एक्स्क्यूज मी –

*(याच वेळी दारावरची बेल वाजते. राजन धावत जाऊन दार उघडतो. दारात लॅबचा शिपाई. त्याने पुढे केलेल्या डिलिव्हरीबुकमध्ये सही करुन राजन त्याच्याकडून लखोटा घेतो. तो जातो.*
*जयेश अतिशय टेन्स. मघाप्रमाणेच डोळे मिटून पुटपुटणे इत्यादी.*
*मानसीला हा प्रकार काय आहे, ते कळत नाही. ती, राजन काहीतरी सांगेल, या अपेक्षोने त्याच्याकडे पाहाते.*
*दरम्यान, राजनने लखोटा फोडलेला. तो आतला रिपोर्ट वाचतो. त्याची जोरदार प्रतिक्रिया. तो ती कंट्रोल करण्याचा प्रयत्न करीत रिपोर्ट जयेशला देतो. जयेश रिपोर्ट वाचून गार"तो.)*

मानसी : काय आहे ते?

जयेश **:** *(अनावर दु:खाला संतापून वाट देत)* शाप-शाप आहे तुझा! यू बिच!- मी बाहेरख्याली...म्हणून मला शाप देऊन निघून गेलीस!...माझं घर मोडलं - पोर दुरावलं - आणि आता मला बाधा झाली!...राक्षासिणी, तुझा शाप मला बाधला!
मला शिक्षा मिळाली - माझ्या स्वैराचाराची!...
आता समाधान होईल तुझं!... तुझं - समाधान होईल!

*(ओक्साबोक्सी रडू लागतो.*
*राजन त्याच्या पाठीवरुन हात फिरवून त्याला शांत करु लागतो.*
*मानसी, प्रचंड आघाताने, एका जागी खिळल्यासारखी उभी.)*

प्रकाश मंदावत जातो...पूर्ण अंधार.

---

मध्यांतर

अंक दुसरा

## प्रवेश : १

गुरमीतचे घर. संध्याकाळ.
सावकाश प्रकाशत जाते...
मानसी बिछान्यावर निजलीये. ती झोपलेली नाही, पण उठून काही करण्याची इच्छाच नसल्याप्रमाणे पडून राहिली आहे...
दारावरची बेल वाजते. कोणीतरी आले, म्हणून नाइलाजाने मानसी बिछान्यातच उठून बसते. कामाचा पोरगा जाऊन दार उघडतो.
राजन आत येतो. मानसीच्या दिशेने संथपणे चालत येतो. आणि तिच्यासमोर बसून राहातो.
काही वेळ कोणीच काही बोलत नाही. मग –

मानसी : संध्याकाळ झाली–?

राजन : हो. सात वाजत आले...

मानसी : मला तर पत्ताच नाही, आजचा दिवस कसा गेला त्याचा.

राजन : कॉलेजला नाही गेलीस?

मानसी : जावंसंच नाही वाटलं. काही करावंसंच वाटत नव्हतं....रोज सकाळी, डोळे उघडताक्षणी, दिवसभराच्या ठरलेल्या कामांचा थवाच्या थवा डोक्यात घुसतो... आज एकही काम सुचलं नाही. ब्लँक – टोटली ब्लँक झालेय. कालचाच दिवस अजून चालू आहे, असं वाटतंय. नुसती लोळत राहिलेय... झोप नाही न् काही नाही...

राजन : मला जाणं भागच होतं ऑफिसला. पण डोक्यात कालचेच विचार होते...ते घालवण्यासाठी ऑफिसच्या कामाचाच आधार घेतला. दिवसभर फक्त कामात डोकं खुपसून राहिलो...पण ते नुसतं ढोंगच! – खरं काम तासाभराचं झालं असेल, तर शप्पथ!

मानसी : मोठ्या आघातांच्या क्षणी वेदना होत नाहीत. त्या नंतर जाणवायला लागतात. काल ऐकलं तेव्हा बधीरच झाले, पण आज एकेक विचार डंख करुन जातोय...कदाचित यापुढचे सगळे दिवस, हे असले डंख सोसण्याचेच असतील!

राजन : असंच काही नाही. एखादवेळी त्यावर उतारासुद्धा मिळेल!

*(काही क्षण शांतता. मग–)*

मानसी : आपण आपलंच बोलतोय!...स्वत: जयचं काय झालंय?

राजन : आता बरा आहे. पण काल, तू निघून गेल्यानंतर भीषण परिस्थिती होती त्याची.

मग मी थांबलो तिथंच. रात्रभर काहीतरी विसंगत – सुसंगत बोलत होता...आत्महत्त्या करतो, म्हणत होता. ताबाच सुटला होता त्याचा स्वत:वरचा!

मानसी : आजवर त्याच्या आयुष्यात सगळं इतकं मनासारखं घडत गेलंय, की दु:खाच्या प्रसंगात स्वत:ला सावरणं कठीणच जाणार त्याला!

राजन : सकाळी डॉ. संघवींकडून प्रिस्क्रिप्शन घेऊन सिडेटिव्ह आणलं. एकच गोळी दिली जयला. लगेच झोपला. रात्रभराचं जागरणही होतंच! ...मघा पाच वाजता त्याच्याकडे गेलो, तेव्हा उठला. डिव्हीडी लावून बघत बसला...थोडा सावरलेला वाटला...मग मी निघून आलो...

मानसी : *(काही क्षण विचारात. मग–)* राजन, माझं एक काम करशील?

राजन : कसलं?

मानसी : एच. आय. व्ही. टेस्ट कुठं करुन घ्यायची, याची माहिती आणशील?

राजन : – तुझ्यासाठी?

मानसी : हो – आता लागणारच ना मलाही चेक करुन घ्यायला?

*(दारावरची बेल वाजते.)*

मानसी : कुणीतरी आलं!...काय पसारा पडलाय बघ!

*(पोरगा दार उघडून जातो. आई आत येते.)*

आई : *(मानसीला पाहून चकित.)* हे काय ग– हा काय अवतार?...गेली नव्हतीस की काय कॉलेजात?...तब्येत बरी आहे ना?

मानसी : हो. मी आलेच फ्रेश होऊन! *(जाते.)*

आई : *(राजनला)* या पोरीचं काय होणारेय, समजत नाही!...एकेक पाहिलं, की धसकायला होतं! *(बोलता बोलता पसारा आवरु लागते.)* गुरमीत नसेलच घरात! – ती कुठली दिवसाउजेडी उगवायला? राजन... तुला आठवतंय ना, मानसी घर किती टापटीप ठेवायची ते? आता धर्मशाळेत उतरल्यासारख्या राहतात तिघी!... आणि तू कसा काय फिरकलास आज या बाजूला? – काही निरोप वगैरे आहे की काय जावईबापूंचा?...काय म्हणताहेत ते?

राजन : *(गोंधळून)* जय ना?...जय – ठीक आहे!

आई : त्यांना काळजी घ्यायला सांग तब्येतीची. आताच उठले ना न्युमोनिया-तून...वेडंवाकडं काही खाल्लंबिल्लं तर पुन्हा आजारी पडायचे! खरं म्हणजे, मानसी हवी होती आत्ता त्यांच्याबरोबर! – बायकोशिवाय खाण्यापिण्याची, औषधबिउषाधाची काळजी दुसरं कोण घेणार?

राजन : *(काही क्षण थांबून, शेवटी मनाचा निर्धार केल्याप्रमाणे)* आई – तुम्हाला काहीतरी सांगायचंय...सांगणं जिवावर येतंय. पण एवढी गंभीर गोष्ट तुमच्यापासून लपवायची तरी कशी?

आई : *(घाबरुन)* बाई –! झालंय तरी काय?

राजन : घाबरु नका. जरा शांत मनानं ऐका....सगळा गुंता झालाय. जयची एच. आय. व्ही. टेस्ट केली...ती पॉझिटिव्ह आलीये!

आई : अरे देवा!

*(खाली कोसळते. डोळ्यांना पदर लावून बसून राहाते. मानसी येते.)*

मानसी : सांगितलंस वाटतं आईला?...एक कठीण काम पार पडलं!

राजन : निघतो मी. रात्री फोन करतो चौकशी करुन!

मानसी : उद्याच जमतं का बघ माझ्या टेस्टचं! *(तो जातो.)*

आई : *(चमकून)* – तुझी टेस्ट?

मानसी : हवीच ना आता करायला?

आई : नाही मानसी, तूदेखील नाही....तू नाही! *(बांध फुटल्यासारखी रडू लागते.)*

मानसी : मलादेखील च हे फार कठीण जातंय, आई! पण काय करायचं?
...जे समोर आलंय – त्याला तोंड द्यायलाच हवं!

*(काही क्षण दोघीही तशाच बसून राहतात. मानसी काही न बोलताच आईला शांत करण्याचा प्रयत्न करीत राहते...आई हळूहळू सावरते.)*

आई : *(भकासपणे)* काय झालं गं हे असं?...असं काय झालं?

मानसी : ही... तुम्हीच पुरुषांना दिलेल्या सवलतींची फळं आहेत आई!

आई : *(दु:खाने)* पूर्वी नव्हतं ग हे असलं काही!

मानसी : तेव्हा नव्हतं...आता आलं! जे माणसांना स्वत:ला समजत नव्हतं – ते काळानं त्यांना समजावून दिलं!...एका परीनं उपकारच मानायला हवेत या आपत्तीचे! – तिनं माणसांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करुन दिली!

आई : जयेश बेजबाबदार वागले...पण तू तर जबाबदारीनं वागत आलीस! मग उद्या तुला काही झालं...तर ती कशाची शिक्षा म्हणायची?

मानसी : ती – जयसारख्या बेफिकीर माणसाशी आयुष्य बांधून घेतल्याची. आज अशा कितीतरी बायका, लागण झाली म्हणून, रडत असतील! – त्यांची चूक एवढीच ना, की त्यांनी आपल्या नवऱ्याला आपलं म्हटलं...सर्वस्वानं?

आई : देव एवढा अन्याय नाही करायचा, मानसी? – तू वाचशील यातून!

मानसी : कसलीच आशा ठेवू नये, आई... ठेवली, की नेमकं उलट होतं. आणि वाईट तेवढं मात्रा हटकून खरं होतं! घर सोडताना मी जयला म्हटलं होतं, तू 'खोजा हाऊस' मधल्या पोरींशी, आणि माझ्याशी, एकाच वेळी संबंध ठेवलास!...मी अपवित्रा झाले! – त्याला तो नुसता युक्तिवाद वाटला... नुसती माझ्या मनाची भावना वाटली... प्रत्यक्षात तिला काही अर्थ नाही, म्हणाला तो! पण आता – आता ते मात्रा झालंच खरं! आता सरळच दिसणार ना की मी दूषित झालेय...
मी अपवित्रा झालेय? *(रडू लागते.)*

आई : रडू नकोस बाळा – अजून काहीही झालेलं नाही! – निदान तुझ्या बाबतीत!... मला मात्रा दैवानं माझी चूक दाखवून दिली!– तू जयेशना सोडलंस म्हणून मी तुला दोषा देत होते! – आता, तोच शहाणपणा होता, म्हणायची वेळ आली!

प्रकाश सावकाश मंदावत जातो.

---

## प्रवेश : २

गायतोंडेंचे घर. संध्याकाळ.
जयेश फोनवर.

जयेश : हॅलो राजन...आय ॲम फाइन! आत्ताच ऑफिसमधून आलो. पण आज, कधी नव्हे ते, इतकं मस्त वाटतंय!...सकाळी उठलो, तेव्हा- पासून हुषारी वाटायला लागली!...असं वाटलं, की आपल्याला काही- सुद्धा झालेलंच नाहीये!...घेतलं रे बाबा, औषध घेतलं! ते कसं विसरेन?– पण एकदम इतकं छान वाटलं! आजाराचा लवलेश नाही!- एकदम ठणठणीत झालो, मला वाटतं त्या औषधानं!... ऑफिसात- सुद्धा आज इतकं काम केलं – खुद्द मनचंदाशेठनं येऊन चौकशी केली – म्हणाला, अलिकडे जरा ऑफ कलर दिसत होता... आज एकदम ब्राइट वाटताय!...हे असंच राहिलं ना, तर मला काही धोका नाही बघ!...थँक्यू.
*(दारावरची बेल वाजते.)*
ठेवतो फोन...कुणीतरी आलंय. – गुडनाइट.
*(दार उघडतो. दारात मानसीला पाहून चकित होतो. ती आत येते.)*

जयेश : तू कशी आलीस?

मानसी : सहज. चौकशी करायला!...कसा आहेस?

जयेश : ग्रेट! अग, चमत्कारच झाला बघ! मला एकदम बरं वाटायला लागलंय!- बरं म्हणजे काय, अगदी फर्स्ट क्लास!

मानसी : खरंच?...दॅट्स अ ग्रेट न्यूज!

जयेश : *(सहज.)* तू कशी आहेस?

मानसी : कळेल आता. माझ्या टेस्टचा रिपोर्ट यायचाय अजून!

जयेश : तुझी कसली टेस्ट? *(ती उदास हसते.)* एच. आय. व्ही. *–? (ती मान डोलावते.)* पण तुला कशाला—?

मानसी : – नको? मी म्हटलं नव्हतं जय? – तुझ्या स्वैराचाराशी माझासुद्धा संबंध आहेच!

जयेश : *(लक्षात येऊन)* ओः शिट्*! (*डोके बडवून घेऊ लागतो.*)* मी असं कसं केलं, मानसी? मी तुला...मी तुला...ओ शिट्! शिट्!

मानसी : *(त्याचे हात धरुन त्याला थांबवण्याचा प्रयत्न करीत)* जय-जय- तू शांत हो बघू! – हे काय वेड्यासारखं...मी सहज बोलून गेले टेस्टचं. – तुझ्यावर आरोप करावा, असा हेतू नव्हता माझा!

जयेश : आरोप कर नाहीतर नको करु. तुझ्या मनात तर येईलच! एवढी भयंकर गोष्ट-

मानसी : जाऊदे म्हटलं ना?...थोडा वेळ तरी आपण हे सगळं विसरुनच जाऊया. मी आलेय एक संध्याकाळ तुझ्याबरोबर गप्पा मारत मजेत घालवण्यासाठी!...त्यातनं तुला आज बरं वाटतंय म्हणजे किती छान...नाही का?

जयेश : मी चहा करु? – तुझ्याइतका छान नाही करता येणार!...पण पुन्हा एकदा पूर्वीसारखं ते चहा पिण्याचं रिशुअल...दोज वंडरफुल मोमेंट्स...

मानसी : नको उगाच त्रास घेऊ, बस इथंच...बाय द वे, राधाबाई येतात ना वेळच्या वेळी कामाला?

जयेश : नाही – राधाबाईंनी काम सोडलं! आता तासाभरासाठी एक पोरगा येतो – त्याला पैशांची फारच गरज आहे म्हणून!...कामवालीनं काम सोडलं! सोसायटीत, कसं कोण जाणे, पण कळलंय! त्यामुळे कामाला माणूस मिळणं कठीण!

मानसी : काहीतरीच! – घरातलं काम केलं म्हणजे लागणारा आजार आहे का हा?

जयेश : नाही ना!...पण हे त्यांना सांगणार कोण?...कामवाल्यांचं राहू दे. पण या सोसायटीतले सगळे सुशिक्षित, सुसंस्कृत म्हणवणारे रहिवाशी – मला पाहून कुजबुजतात...माझ्यासमोर कुजबुजू नये, इतके मॅनर्स नाहीत त्यांना!

मानसी : राहू दे. चार दिवस कुजबुजतील. मग आपणहूनच बंद होतील!

जयेश : *(काही क्षणांनी)* तनूला नाही आणलंस? – मी तिला घेऊन गेलो असतो गार्डनमधे!

मानसी : खेळायला गेली होती! – पुन्हा येईन, तेव्हा आणीन!

जयेश : नाही आली, तर बरंच म्हणा!- तिनं हळूहळू मला विसरलंच पाहिजे!
*(दारावरची बेल वाजते. जयेश दार उघडतो. दारात आई.)*

जयेश : *(उत्साहाने)* हल्लो आई–! व्हॉट अ प्लेझंट सप्र्ाइज!...वेलकम वेलकम! या– आत

या!

आई  : *(आत येऊन करडेपणानं)* मानसी इथं आलीये असं कळलं.

जयेश : हो – आत्ताच आली!...बसा ना!

आई  : बसत नाही. मी मानसीला परत घेऊन जायला आलेय!

जयेश : डोन्ट वरी!– ती परत जाणारच आहे! इथं थोडीच राहायला आलीये ती?

आई  : तुमचा काय नेम?...गोड बोलून कायमची ठेवूनसुद्धा घ्याल!

जयेश : इतकं रागवायला काय झालं, आई?

आई  : *(एकदम उसळून)* शरम नाही वाटत, काय झालं असं विचारायला? काय झालं ते सगळयांनाच चांगलं माहितेय!...गलिच्छ-गलिच्छ प्रकार झालाय सगळा!...काही विचारायला नको न् काही बोलायला नको!

जयेश : *(धक्का बसून)* आई, तुम्हीच असं म्हणता?...मला आईवडील नाहीत, म्हणून आजवर मी तुम्हालाच आई मानत आलो –

आई  : – ते विसरुन जा. यापुढं आपला कसलाच संबंध नाही.

जयेश : हे सांगायला तुम्ही इथं आलात? *(मानसीकडे वळून)* तुला माहीत होतं, या इथं येणारेत ते! म्हणून माझी शोभा पाहायला तू आलीस?

मानसी : नाही जय – प्लीज – असा काहीतरी गैरसमज करुन घेऊ नकोस!

आई  : *(जयेशला)* तिला कशाला बोलताय! तिला काही ठाऊक नव्हतं. मीच तर्क केला, ती घरी भेटली नाही त्यावरुन!...खरं तर इथं पाऊलसुद्धा ठेवायला नको तिनं!

जयेश : पण याआधी – तुम्हीसुद्धा हे घर आपलं समजत होता!

आई  : तेव्हाची गोष्ट वेगळी! – आता सगळं बदललंय!

जयेश : काय बदललंय? – तो रिपोर्ट आलाय, एवढंच ना? उद्या तुमच्या मुलीचा तसाच रिपोर्ट आला तर – तर तिच्याशीही नातं तोडणार आहात?

आई  : ती स्वत:हून शेण खायला बाहेर गेलेली नाही...तुमच्यामुळंच तिला –

मानसी : आई, आता पुरे ना!

आई : *(जयेशला)* तुम्ही स्वत:च्या आयुष्याचं वाटोळं केलंत – माझ्या मुलीचा सत्यानाश केलात. माणूस नाही तुम्ही...राक्षास आहात, राक्षास!

मानसी : आई, पुषकळ झालं. उगाच तमाशे करुन त्याचा काही उपयोग आहे का?

आई  : *(जयेशला)* जन्मभर तुमच्यासारख्याच एका पुरुषामुळं मी मनातल्या मनात रडत,

कुढत राहिले – पण त्याला मात्रा कसलीच शिक्षा झाली नाही. म्हणून तो बदललाही नाही...नीतीच्या व्याख्यानांचा कुठं कोणावर परिणाम होतो? जेव्हा स्वत:चं शरीर बंड करतं, तेव्हाच माणसाला खरी जाग येते!

जयेश : *(चिडून)* नुसत्या पेशंटलाच नाही आई, त्याच्या जवळच्या माणसांना – देखील उशिराच जाग येते...रिपोर्ट येईपर्यंत मी तुमचा एक भला जावई होतो. तुम्ही माझ्यावर मुलासारखी माया करीत होता. ज्या माझ्या स्वैराचारामुळे मानसी मला सोडून गेली, तोही समजून घेऊन, तुम्ही माझ्या पाठीशी उभ्या राहिलात! आणि आता मात्रा – फक्त मला बाधा झाली एवढ्यानं तुम्ही बदललात?...जे एरवी सहज चालून जात होतं, ते आता गलिच्छ ठरलं?...आधी तुम्ही मुलीला घर सोडू देत नव्हता...आता तुम्हीच तिला हाताला धरुन खेचून न्यायला आलात? ...हा ढोंगीपणा नाही? दुटप्पीपणा नाही?

आई : आहे मी दुटप्पी – आहे मी ढोंगी! आणि माझी नातीगोती – माझा शेजारपाजार – सगळा माझ्यासारखाच आहे! उद्या माझ्या मुलाला हे कळलं तर केवढा हाहा:कार होईल माहितेय?...तुम्हा दोघांचं हे असं काहीतरी झालं तर माझ्या नातीला मी एकटी म्हातारी कशी वाढवू? या संकटाची नुसती कल्पना केली, तरी भीतीनं माझे पाय लटलटतात ...डोळ्यांसमोर अंधारी येते!...हे संकट तुम्ही-तुम्ही आणलंय आमच्यावर!...आता स्वत: भोगताय म्हणून तुम्हाला वेदांत आठवतोय – आम्हाला ढोंगी म्हणताय! पण स्वत:वर वेळ येईपर्यंत तुम्हीदेखील या ढोंगी समाजातलेच एक होता...हे विसरु नका! – चल मानसी, तू आधी माझ्याबरोबर बाहेर पड!...यांच्या मनात कधी काय येईल, आणि हे तुला कशी फशी पाडतील, काही सांगता नाही येणार!...इथं यांच्याबरोबर तू एकटी मुळीच सुरक्षित नाहीस!

मानसी : भलभलत्या गोष्टी डोक्यात घेऊन काळजी नको करु, आई. मी येईन थोड्या वेळानं. तुला जायचं तर तू हो पुढे.

आई : जाते. पुन्हा कधी मी इथं पाऊल टाकणार नाही. – आणि तूदेखील आज आलीस इथं, ती शेवटची – हे लक्षात ठेव. *(जाते.)*
*(क्षणभर शांतता.)*

मानसी : यू मस्ट एक्स्क्यूज हर – तिला मोठाच धक्का बसलाय!

जयेश : त्यांच्या शिव्याशापांचं काही नाही मला वाटत. पण त्या मला आईसारख्या...त्यांनादेखील मी नकोसा झालो....याचं दु:ख होतं!

मानसी : तिला काळजी वाटतेय, आजची, उद्याची. काळजीनं सैरभैर झालीये ती.

जयेश : तुला देखील वाटत असेल – मी चुकीचं वागलो – त्याची शिक्षा मला मिळाली – ठीकच झालं!

मानसी : नाही जय, मी चूक काय हे सांगू शकते. चूक करणाऱ्यापासून दूर जाऊ शकते. पण

चुकीला शिक्षा काय व्हावी हे ठरवण्याचा अधिकार मला नाही. एकच वाटतं, शारीरिक पातळीवर आपण चूक सहज मान्य करतो. न करुन चालण्यासारखंच नसतं. तीच चूक नैतिक पातळीवर मान्य करता आली तर?– तर आपण माणूस म्हणून मोठे होऊ. तुला, बाधा होण्याआधीच, स्वत:ची चूक नीतीच्या विचारानं मान्य करता आली असती तर –

जयेश : हे तू बोलू शकतेस. कारण तुझा नैतिक अधिकार शाबूत आहे. ...उद्या तुझा रिपोर्ट पॉझिटिव्ह आला, तरी तुझी मान ताठ राहील. ...कारण त्यात चूक तुझी नसेल - माझी असेल!
*(फोन वाजतो. मानसी तो उचलते.)*

मानसी : हॅलो, मानसी बोलतेय! *(जयेशला)* - राजन!...*(ऐकते. मग रीलिफ वाटून खाली बसते.)* थँक यू व्हेरी मच. मी निघतेच आहे आता, घरी जायला! – हं – वाटेवर कलेक्ट करीन. नंतर बोलू सविस्तर. *(फोन ठेवते.)*

जयेश : – काय म्हणत होता?

मानसी : माझी टेस्ट निगेटिव्ह आली. रिपोर्ट तर ते माझ्याच हातात देतील.
पण राजनचा मित्रा लॅबमध्ये आहे, त्याच्याकडून कळलं!

जयेश : काँग्रॅच्युलेशन्स मानसी, यू हॅव एस्केप्ड *(तिला मिठी मारतो.)*. धिस कॉल्स फॉर अ सेलिब्रेशन...व्हॉट विल यू हॅव? शॅम्पेन?

मानसी : नंतर कधीतरी. आता उशीर होईल. लॅब बंद व्हायच्या आधी रिपोर्ट कलेक्ट करायचाय!

जयेश : माझ्या मनावरचा एक भार उतरला! ...तू वाचलीस म्हणून तर आनंद झालाच! पण बरं वाटलं, की निदान तुझं आयुष्य माझ्यामुळे वाया गेलं नाही!

मानसी : तुझंही अजून वाया गेलेलं नाही जय. थोडा आत्मविश्वास ठेव. घाबरुन जाऊ नकोस. हळूहळू सगळं वळणावर येईल. एड्स पेशंट नॉर्मल आयुष्य जगू शकतो. फक्त त्यानं आधीची बेफिकिरी कमी करुन स्वत:ला नवीन शिस्त लावून घ्यायला हवी. ... शिस्तीनं जगण्यात वाईट काय आहे जय? उलट त्यामुळे तुझं आयुष्य पहिल्यापेक्षा अधिक आखीव रेखीव होईल!

जयेश : होईल कदाचित - पण शिस्तीनं जगायला आयुष्यच कितीसं उरलंय?

मानसी : उरलंय तेवढंही कमी नाही, जय...आणि कुणाच्या आयुष्याचा भरंवसा देता येतो? कुणाला अचानक हार्ट अटॅक येतो, कुणाला कॅन्सर होतो – अपघात तर रोजचेच आहेत...फक्त एड्स झालेल्यांनाच मरणाचं भय असतं, असं थोडंच आहे? मरण कुणालाही, कधीही येऊ शकतं!
*(क्षणभर शांतता.)*

जयेश : मानसी, तू परत ये ना...

मानसी : मी निघते. उशीर झालाय.

जयेश : परत कधी येशील?

मानसी : येईन अशीच, अधुनमधून. तोवर...टेक केअर! *(जाऊ लागते.)*

जयेश : मानसी –

मानसी : *(वळून)* काय?

जयेश : काही नाही.

मानसी : *(हसून)* गुडनाइट. *(जाते.)*

*(ती जाईपर्यंत तो तिच्याकडे पाहात राहातो – आणि अचानक त्याला खोकल्याची उबळ येते. इतकी जबरदस्त, की आता जगतो, की मरतो, असे होऊन जाते. काही क्षणांनी खोकला हळूहळू थांबतो...पण त्याला इतका वेळ वाटत असलेली हुषारी कुठेच्या कुठे गेलेली. विलक्षण थकून जाऊन तो सोफ्यावर अंग टाकतो...)*

जयेश : मानसी...परत ये – परत ये ग मानसी...

प्रकाश सावकाश मंदावत जातो.
पॉप म्युझिक हलकेच 'फेड इन'.

---

## प्रवेश : ३

सनसेट बीअर बार. संध्याकाळ.
पाश्र्वभूमीत हलक्या आवाजात पॉप म्युझिक. बारचा एक कोपरा. जयेश आणि राजन येतात. बसतात. वेटर पुढे होतो...

जयेश : दोन किंगफिशर – *(वेटर जातो.)* आज बऱ्याच दिवसांनी आलो नाही, आपण या बीअर बारमध्ये?

राजन : येस. जवळ जवळ वर्षाभरानं.

जयेश : पण आज तू मला मुद्दाम इथं कां घेऊन आलास?...व्हॉट्स द स्पेशल ऑकेजन? – तुझा बर्थडे –? नो नो, आजच्या तारखेला नाही...

राजन : तुला आठवतंय जय, आठ वर्षांपूर्वी इथंच आपण पहिल्यांदा भेटलो...

जयेश : चांगलं आठवतं...तेव्हा तुला बीअरचीपण सवय नव्हती. चक्क आउट झाला होतास तू दोन बीअरमध्ये!

राजन : आणि माझी अवस्था लक्षात घेऊन तू – आपली ओळखसुद्धा नसताना माझं बिल भरलंस – वर मला टॅक्सीनं घरापर्यंत पोहोचवलंस!

जयेश : तेव्हा तुझंही लग्न झालेलं नव्हतं. तू एकटाच राहात होतास –

राजन : म्हणून तर ते शक्य झालं!... नाहीतर नीतासमोर आउट होऊन जाण्याची काय शामत माझी? *(दोघेही हसतात.)*

जयेश : नंतर मी दिलेल्या बिलाची परतफेड करण्यासाठी म्हणून तू मला इथं बोलावलंस...मग आपली मैत्रीच झाली!...तुलाही बीअर पिता यायला लागली! *(दोघेही हसतात.)*

राजन : हळूहळू तुझं हसणं, बोलणं, वागणं पहिल्यासारखं होतंय जय – गुड साइन!

जयेश : तरीही – वेळ लागेल हे स्वीकारायला मला!... इतरांना तर अधिकच!
आमचे सोसायटीवाले तर साले इतके हरामखोर आहेत...दोन नोटिसा पाठवल्या मला – पंधरा दिवसांच्या अंतरानं...

राजन : कशासाठी?

जयेश : जागा खाली करण्यासाठी!

राजन : *(चकित.)* काय सांगतोस?

जयेश : म्हणे – आम्हाला खात्रीपूर्वक कळले आहे, की तुम्ही एड्सचे रुग्ण आहात. आमची सोसायटी हे अशा रुग्णांचे इस्पितळ नाही...इतरांना, विशेषत: तरुणांना व लहान मुलांना, संसर्गाची भीती असल्यामुळे तुम्ही तिसरी नोटिस मिळण्याच्या आत...

राजन : नानाची टांग त्यांच्या – एड्सचा संसर्ग वगैरे काही होत नाही, हे काय त्यांना माहीत नसेल?– कोणाला तरी पैसे खाऊन विकायची असेल जागा, दुसरं काय?– तू एकजात दाद देऊ नकोस!

जयेश : मी कशाला दाद देतोय, तू एवढा खंदा माझ्या पाठीशी उभा असताना!

*(वेटर बाटल्या, ग्लासेस, खाद्यपदार्थ इ. घेऊन येतो. ग्लासेस भरतो... 'और कुछ?' विचारुन जातो.)*

जयेश : तुला सांगायचं राहिलं. ती मानसीची मैत्रीण – गुरमीत कौर काय ग्रेट आहे !

राजन : – केलं काय तिनं?

जयेश : अरे, आताशा ती एड्स प्रतिबंधक सोसायटीचंही काम करायला लागलीये!...परवा सरळ आमच्या ऑफिसात शिरुन ती मनचंदाशेठला भेटली! – त्याच्या परवानगीनं पोस्टर्स लावून घेतले ऑफिसात!

राजन : एड्स कंट्रोलचे?

जयेश : ' **HIS AIDS IS NONE OF YOUR BUSINESS** ' असे!

राजन : – मला नाही समजलं!

जयेश : अरे म्हणजे, त्या कोणाला एड्स झालाय याचा बाऊ तुम्ही कशाला करता? – तुम्हाला करायचंय काय त्याच्याशी?...असं हेडिंग. पुढे ते सगळं...एड्स श्वासातून होत नाही, स्पर्शातून होत नाही, वापरलेल्या भांड्यातून होत नाही, टॉयलेटमधून होत नाही, मिठीतून होत नाही, चुंबनातून होत नाही...फक्त रक्त, वीर्य यातून होतो. – आता तसला काही संबंध तुम्ही त्या पेशंटशी ठेवणार नसाल, तर त्याला एड्स झालाय, याचा तुम्हाला काय प्रॉब्लेम आहे? – त्याचं काम तो नीट करतोय ना- मग बस!...अशा आशयाचे पोस्टर्स!

राजन : – तुमच्या सोसायटीत हवेत लावायला!

जयेश : – एवढं करुन गुरमीत थांबली नाही! मीटिंग घेतली एक स्टाफची!
– पंजाबी पोरगी बोलतेय म्हणून सगळे जमले!...आणि न जमून सांगतात कोणाला? - खुद्द मनचंदाशेठलाच अध्यक्षा केलं ना तिनं?
...मग त्यालाही दोन शब्द चांगलेच बोलावे लागले!

राजन : *(कौतुकाने)* तू केलंस की नाही भाषाणबिषाण?

जयेश : छट्! मी कशाला बोलू? – माय एड्स इज नन् ऑफ देअर बिझनेस! – पण आता मी ठरवलंय. यापुढं कोणी त्याविषायी विचारलं, तर लपवायचं नाही, त्यांच्या विचित्रा वागण्याचा स्वत:ला त्रास करुन घ्यायचा नाही – आणि शक्य तेवढं नॉर्मल वागायचं!

राजन : ये हुई ना बात!

जयेश : तसा मनचंदाशेठला, माझ्या वरचेवर आजारी पडण्यामुळं संशय आहे...आणि त्याला आहे, म्हणजे इतरांनाही असणार! – पण कोणी माझ्याशी काही वावगं वागत नाही! - अर्थात क्रेडिट ऑल्सो गोज टू डिसूझा.

राजन : डिसूझा कोण?

जयेश : तू बाहेर घेतोस ना, तशीच माझी काळजी ऑफिसमध्ये घेणारा माझा दोस्त! – त्याला ठाऊकेय! – आणि इतर कोणी विरोध केला, तर हा त्यांना तेच सांगून गप्प बसवतो! 'हीज एड्स इज नन ऑफ युअर बिझनेस!' खरंच – प्रत्येक ऑफिसमध्ये ही स्लोगन लावून ठेवायला हवी!

राजन : *(किंचित विचारात.)* जय – तुमच्याकडे येण्याआधी किती ऑफिसांमध्ये गेली होती ही गुरमीत?

जयेश : *(विचार करुन)* मला वाटतं, आमचं पहिलंच असावं! – कारण हा एक नवीन प्रयोग आहे असं म्हणत होती ती आपल्या भाषाणात! ऍन एक्सपेरिमेंट इन एलिमिनेटिंग प्रेज्युडाइस अगेन्स्ट एड्स! ...एड्स- विषायीचा पूर्वग्रह घालवण्याचा प्रयोग!...त्याची माहिती देण्यासाठी तिनं मनचंदाशेठला न्यूज चॅनेलवरदेखील बोलावलंय! – शेठ एकदम खूषा!

राजन : नाही – मला विचारायचं होतं...की हा प्रयोग तुमच्याच ऑफिसपासून सुरु करण्याचं...तिला काही खास कारण नसेल ना?

जयेश : यू मीन – माझी नोकरी जाऊ नये म्हणून –

राजन : जस्ट अ थॉट...कदाचित मानसीनंही तिला ही कल्पना...

जयेश : मानसीनं? – माझी नोकरी वाचवण्यासाठी – *(टच्ड.)*

राजन : अगदी असंच काही नाही! कदाचित समाजाचा दृष्टिकोन सुधारावा, म्हणूनही –

जयेश : राजन, आय मिस मानसी. आय टेरिबली मिस हर...तू सांग ना तिला परत यायला!

राजन : ती? – माझं ऐकणार?...उलट मी तुला फितुर आहे, असा तिला पहिल्यापासून संशय आहे!

जयेश : नाही रे – मी आपला उगाच भावनेच्या भरात बोललो! खरं म्हणजे मला काय राइट आहे तिला परत बोलावण्याचा?...पण ती ज्या कारणासाठी निघून गेली, ते आता अजिबात शिल्लक राहिलेलं नाही! ‘खोजा हाऊस’मधून कितीदा फोन आले – मेसेजेस आले...पण मी कधीच गेलो नाही! – तिथं नाही, की आणखी कुठंच नाही!...माझा रोग दुसऱ्याला देण्याइतका दुष्ट नाही मी! सावधगिरी घेता येईल – नाही असं नाही! पण – नकोच ते! नाही जात. असहा होतं. पण इलाज नाही. आय डिझर्व्ह इट! पूर्वी भूक डबलतिबल भागवली, मग आता उपासमार होणारच! – निसर्गात फार बॅलन्स असतो बाबा!

राजन : मी सांगेन मानसीला, घरी परत जा म्हणून!

जयेश : तेदेखील नुसतं सोबतीसाठी...नाहीतर आता नवराबायकोचे संबंध ठेवूच शकणार नाही आम्ही!...तिच्या बाबतीत – रिस्कसुद्धा घेणं – हा भयंकर गुन्हा होईल!...जाऊ दे. तू काहीच सांगू नकोस. ती आहे तिथंच सुखात राहू दे. सुखात कसली राहाते म्हणा – तिथूनही माझीच काळजी करीत असेल – हे माहितेय मला!
*(काही क्षण, नुसते पॉप म्युझिक ऐकू येत राहाते. मग-)*

राजन : जय, तुला एक सागांयचंय! पण कसं सांगावं ते कळत नाही...

जयेश : सांगून टाक – मला आता कशानंच धक्का बसणार नाही!

राजन : *(थांबून)* जय – यापुढे मला...तुला फारसं भेटता येणार नाही...

जयेश : ओ: शिट् ! – नीता...?

राजन : हो. मला माहीत होतं, की तिला काही समजणार नाही – काही पटणार नाही!...म्हणून मी तुझा प्रॉब्लेम तिच्यापासून जमेल तितके दिवस लपवला!- पण

नंतर तिला संशय यायला लागला...काहीतरी गैरसमज करुन घेऊन ती फाटे फोडीत बसेल, ते नको, म्हणून तिला सांगणं भागच पडलं! ...लगेच तिनं धोशा लावला, की जयकडे जाणं बंद कर...

जयेश : आय कॅन अंडरस्टँड!

राजन : मी तिला किती समजावून सांगितलं, की हा आजार रोजच्या वागण्यात सांसर्गिक नाही! – अगदी सर्दीपडशाइतकाही नाही! पण तिला काही केल्या पटत नाही! – शिवाय डोक्यात कचरा भरणारे लोक असतातच आजुबाजूला!...त्यांनी तिच्या मनात भरवून दिलंय, की रोग लागो वा न लागो, मी तुझ्या संगतीत असणं हीच बदनामी आहे!
*(काही वेळ दोघेही गप्प. मग-)*

जयेश : ओके...बाय बडी! तू भेटू नकोस मला. आणि काळजीही नको करु माझी. खूप वेळ घालवलास माझ्यावर. आता थोडं स्वत:कडे, घराकडे, लक्षा दे...डोन्ट वरी. अगदीच वेळ पडली तर डिसूझा आहे!...तुम्ही सर्वांनी आत्तापर्यंत खूप लाड केलेत माझे...पण कधी ना कधीतरी – सवय करायलाच हवी ना एकटं राहाण्याची!

राजन : सॉरी जय – आय डिडन्ट मीन टू हर्ट यू – ....पण नीता – तुला माहितेय ना तिचा स्वभाव? डोक्यात घेईल ते खरं करील!...मी जर तुला भेटत राहिलो – तर – धमकीच दिलीये तिनं मला सोडून जाण्याची!

जयेश : नको रे बाबा – तुझा आणखी संसार मोडण्याचं पातक मी कशाला घेऊ? तू आपला सुखानं – *(एकदम लक्षात येऊन)* अच्छाऽ म्हणजे यासाठी होती आजची ही स्पेशल पार्टी?...स्पेशल पार्टी फॉर पार्टिंग ऑफ स्पेशल फ्रेंडस्! – जिथं आपण पहिल्यांदा भेटलो त्याच ‘सनसेट बार’ मधे! – साल्या तुझ्या सेन्स ऑफ प्रोप्रायटीला दाद देतो आपण!

राजन : मला माफ कर जय – मी भित्रा आहे!

जयेश : कम ऑन – डोन्ट बी इमोशनल! – आता काय तुला पूर्वीसारखी एवढीशी बीअर चढत नाही! *(त्याचा मोबाइल वाजतो.)* हॅलो, डिसूझा...काय सांगतोस? टेरिफिक न्यूज है यार! *(राजनला)* डिसूझा उद्यापासून बदलापूर ऑफिसला ट्रान्सफर होतोय – ऑन प्रमोशन! *(मोठ्याने हसतो.)*...हसलो का म्हणजे? आय ॲम हॅपी अबाउट युअर प्रमोशन – यू डिझर्व्ह इट! माय हार्टिएस्ट काँग्रॅच्युलेशन्स! *(पुन्हा मोठ्याने हसतो.)*...कानाखाली वाजवशील? – हसतोय म्हणून? ...शुअर आय मेन्ट नो ऑफेन्स! पण कोइन्सिडन्स बघ. आजच माझा दुसरा एक अगदी क्लोजेस्ट फ्रेंड मला सोडून जातोय – यू नो व्हाय! *(राजन त्याचा हात दोन्ही हातांनी घट्ट पकडतो.)* आणि याच वेळी तूही दूर जातोयस म्हणजे – हसू नको, तर काय करु?...दॅट्स ओके! – ओके म्हटलं ना? – आता एक काम कर! तात्काळ टॅक्सी पकड – आणि सनसेट बीअर बारवर ये...सनसेट – सन् – सेट...हां!- इथं आमचं

सेलिब्रेशन चाललंय!...वुइ आर सेलिब्रेटिंग अवर पार्टिंग!- यू मस्ट जॉइन अस! येतोयस ना?...आम्ही वाट बघतोय!
*(पार्श्वभूमीतील पॉप संगीताचा आवाज वाढत जातो...)*

प्रकाश मंदावतो

---

प्रवेश : ४

गायतोंड्यांचे घर. संध्याकाळ.
प्रकाश सावकाश येतो...
बेडरुममध्ये, जयेश तापाच्या गुंगीत बिछान्यावर.
त्याने तात्पुरता कामावर ठेवलेला मुलगा त्याला औषध ओतून देतो.

मुलगा : साहेब, औषध घेता ना?

जयेश : ...पुन्हा केलास चहा?...अग, आत्ताच केला होतास ना?

मुलगा : घ्या ना साहेब –

जयेश : मला आवडतो तुझ्या हातचा चहा...पण म्हणून किती प्यायचा? *(औषध पितो.)* किती कडू –? साखर घातलीच नाहीस की काय? अग, मला डायबेटीस नाहीये कडू चहा प्यायला!

मुलगा : *(त्याच्या काखेत थर्मामीटर ठेवतो.)* हं – हात दाबून घ्या –

जयेश : *(मधेच भानावर येऊन)* तू कुठून आलास मधेच? – आणि मानसी कुठं गेली?

मुलगा : त्या नाहीयेत इथं.

जयेश : – नाही काय म्हणतोस? आत्ता नव्हती का ती इथं? घरात गेली असेल.

मुलगा : *(थर्मामीटर काढतो. पाहातो.)* कमी आहे मघाच्यापेक्षा.

जयेश : मला झोप येतेय....मानसीला म्हणावं, मला झोपू दे. तू नुसती बसून राहा माझ्या उशाशी. काही बोलू नकोस...
*(दारावरची बेल वाजते.)*

जयेश : बाप रे, ब्रेक दाबला कोणीतरी रस्त्यात! काय झालं असेल?...मला भीती वाटते...

मुलगा : घाबरु नका साहेब, ब्रेक नाही – बेल वाजली दारावरची...मी आलोच!
*(एवढ्यात परत एकदा बेल वाजते. मुलगा जाऊन दार उघडतो. दारात गोडबोले उभा.)*

गोडबोले : *(आत येऊन)* साहेब कुठायत तुझे?

मुलगा : झोपलेयत. त्यांना ताप आलाय.

गोडबोले : गुड. त्यांना म्हणावं चला, खाली ॲम्ब्युलन्स आलीये, तुम्हाला हॉस्पिटलमध्ये पोहोचवायला.

मुलगा : *(गोंधळून)* कोणी आणलीये?

गोडबोले : सोसायटीच्या लोकांनी.

मुलगा : पण आम्ही – सांगितलं नव्हतं...

गोडबोले : आता जास्त बोलू नकोस. जा च घेऊन ये त्यांना.

मुलगा : *(बेडरुममध्ये येऊन, जयेशला)* साहेब - उठा...तुम्हाला हॉस्पिटलमध्ये न्यायला आलेयत! *(त्याला उठवतो.)*

जयेश : पण मानसी येतेय ना बरोबर?...देन इट्स ओके.
*(मुलाच्या आधाराने सावकाश चालत हॉलमध्ये येतो.)*

गोडबोले : गुड इव्हनिंग मिस्टर गायतोंडे. हाउ आर यू? *(नोटीस व तिची प्रत पुढे करतो.)* ही घ्या...इथं सही करा.
*(जयेश गुंगीतच सही करतो. गोडबोले ती प्रत स्वत:कडे ठेवतो.)*

जयेश : आता कुठे जायचं?

गोडबोले : हॉस्पिटलमध्ये. तिथंच तुमची नीट काळजी घेतील.

जयेश : आम्ही दोघंही गेल्यावर... घराकडे कोण पाहणार?

गोडबोले : आम्ही आहोत ना? ...चला.

*(गोडबोले जयेशला नेऊ लागतो. एवढ्यात, उघड्या राहिलेल्या दारातून मानसी आत येते. तिच्या हातात बॅग. खांद्याला मोठी झोळी.)*

जयेश : मानसी –!

मानसी : हे काय? कुठं नेताय त्याला?

गोडबोले : केइएम हॉस्पिटलमधे – आजारी आहेत ना?

मानसी : जय –! *(कपाळाला हात लावून बघते.)* ताप आहे!...कुठं न्यायचं नाही त्याला! *(मुलाला)* त्याला झोपव आत नेऊन.

जयेश : मानसी – ! तू येतेस ना?

मानसी : आत्ता आले! तोवर तू पड जरा आत जाऊन – *(जय मुलाबरोबर आत जातो. गोडबोलेला)* गोडबोले – हे काय चाललंय?

गोडबोले : हा फ्लॅट रिकामा करण्यासाठी या हाउसिंग सोसायटीचा सेक्रेटरी म्हणून गायतोंड्यांना दोन नोटिसा पाठवल्या होत्या सोसायटीनं. ही तिसरी. *(तिला देतो.*

ती वाचते.*)* सही आहे गायतोंड्यांची यावर.

मानसी : अच्छा, तुम्ही आम्हाला घराबाहेर काढायला आलाय! *(नोटीस फाडून टाकते.)* पुन्हा असला वाहातपणा करु नका!...मी आजच पोलीस स्टेशनवर तुमची कम्प्लेन्ट देऊन ठेवणारेय!

गोडबोले : त्याआधी, आम्हीच कम्प्लेन्ट दिलेली आहे – एड्सचा पेशंट सोसायटीत ठेवून सार्वजनिक आरोग्य बिघडवल्याबद्दल!

मानसी : असली मूर्ख तक्रार कुठलाच पोलीस ऑफिसर घेणार नाही! घेतली तर त्याची नोकरी जाईल!...एड्स झालेल्यांना, इतर कुठल्याही पेशंटस्प्रमाणेच स्वत:ला पाहिजे तिथे राहण्याचा हक्क आहे! – आणि त्यांच्यामुळे सार्वजनिक आरोग्याला काहीही बाधा पोहोचत नाही! – जागा बळकावण्यासाठी असल्या खोट्या अफवा पसरवून तुम्ही आमचं आणि सोसायटीतल्या लोकांचं नुकसान करताय!

गोडबोले : तुम्ही कोण आम्हाला हे सुनावणाऱ्या? – अं? संबंध काय तुमचा? – तुम्ही गायतोंड्यांना कधीच सोडून गेलाय्! ...नशीब समजा आम्ही त्यांना फुटपाथवर टाकत नाही आहोत. धर्मार्थ हॉस्पिटलमध्येच ठेवतोय. तिथून तुम्ही त्यांना, हवं तर, कुठंही हलवू शकता. आम्ही या फ्लॅटला सोसायटीचं कुलूप घालणार आहोत. – तुमच्या सवडीनं, आमच्याकडून चावी घेऊन तुम्ही कधीही तुमचं सामान नेऊ शकता.

मानसी : *(भयंकर खवळून)* गेट आउट – गेट आउट ॲट वन्स!...तुम्हाला काय वाटलं? जय आजारी आहे – एकटा आहे – म्हणजे तुम्ही त्याला घराबाहेर काढू शकाल? फरगेट इट! – जय आजारी असेल; पण तो एकटा नाही! मी आहे त्याच्याबरोबर!...हा फ्लॅट आम्हा दोघांच्या नावावर आहे – आणि तो तुम्हाला कोर्टात झगडूनसुद्धा मिळणार नाही! कारण कायदा पेशंटच्या बाजूचा आहे! नाव् – गेट लॉस्ट!

गोडबोले : *(जाताजाता)* आम्ही सोसायटीच्या मीटिंगमध्ये हा प्रश्न...

मानसी : नुसती कमिटी मेंबर्सची नको – जनरल बॉडी मीटिंग घ्या. सगळ्या रहिवाशांनाही बोलवा. मी हजर राहाते. मला एकदा सर्वांचे गैरसमज दूर करायचेच आहेत. म्हणजे तुमच्यासारख्यांना त्यांचा फायदा नाही घेता येणार! ...निघा आता – आणि परत असलं धाडस करु नका... विसरु नका – मी आहे इथं जयबरोबर – तुम्ही त्याला यापुढे त्रास नाही देऊ शकणार – तुम्हीच काय – कुणीच नाही देऊ शकणार – त्याला वाळीत टाकून त्याचं आयुष्य कमी नाही करु शकणार. यापुढे सगळं जग दूर लोटत असताना – स्वत:चं शरीरही साथ देत नसताना त्याला आधार मिळेल तो माझा – जगाला सामोरं जाण्याचा, आजाराला तोंड देण्याचा आत्मविश्वास मी त्याला देईन – आणि जेव्हा केव्हा हे जग सोडणं त्याला भागच पडेल, तेव्हाही तो कडवट तोंडानं जाणार नाही – हसतमुखानं या जगाचा निरोप घेईल...तेवढ्यासाठी...मला त्याच्याबरोबर राहायला हवं. सगळं

सोडून मला इथे येऊन राहायला हवं. कारण या अवस्थेत त्याला फार गरज आहे...माझी...

मुलगा : *(बाहेर येऊन)* बाई – कुणाशी बोलताय? गोडबोले तर मघाच गेले!

मानसी : अं – हो – तू जा – जयसाठी चहा कर.
*(जय येतो.)*

जयेश : मानसी -

मानसी : मी परत आलेय जय!

जयेश : अग पण तू गेली होतीस कुठं?...इथंच होतीस ना तू?

मानसी : घाम येतोय् वाटतं...ताप जाईल आता!

जयेश : *(आता बराचसा भानावर आलेला.)* लगेच जाणार नाहीस ना घाईघाईनं?

मानसी : नाही. आता मी कधीच जायची नाही तुला सोडून. मी कायमचीच परत आलेय!

जयेश : कायमची...परत आलीस? – तुझ्या तत्त्वांशी कॉम्प्रोमाइज करुन –?

मानसी : नाही जय. कॉम्प्रोमाइज इज अ सॅड वर्ड! आय हेट कॉम्प्रोमाइजेस. मी परत आले ही तडजोड नाही!...त्या वेळी मला निघून जायला कारण होतं...आता परत यायलाही कारण आहे. जय, स्वैराचारी नवऱ्याबरोबर राहणं अनैतिक आहे...तसंच, आजारी माणसाला वाऱ्यावर सोडणं हेही अनैतिकच आहे. म्हणून मला परत येणं भाग होतं. त्या चुकणाऱ्या जयसाठी नाही. या आजारी जयसाठी...

*(तो तिच्या मांडीवर डोके ठेवून झोपतो.
ती त्याच्या केसांमधून बोटे फिरवू लागते...)*

प्रकाश मंदावत जातो...अंधार.

☆

# रत्नाकर मतकरी

# जादू तेरी नजर

“महाकवी, महानाटककार, महाशेक्सपियर–महाचालू! तो म्हणतो, प्रेम ते काय? ये तो बस नजर का धोखा है! तुम्ही म्हणा, प्रेम हृदयात असतं... शेक्सपियर म्हणतो, ते नजरेत असतं! कधी कोणाची नजर पडेल, जादू होईल आणि प्रेम जन्माला येईल, हे सांगता येत नाही– तशीच त्या प्रेमाला कधी कुणाची नजर लागेल, ते पण आम्हाला नाही रे बाबा माहीत! सगळा मामला नजरेचा! असं आम्ही नाही म्हणत! खुद्द शेक्सपियर– सगळ्या नाटककारांच्या बापाचा बाप– त्याच्या ‘मिडसमर नाइट्स ड्रीम’ या नाटकात म्हणतो...”

शेक्सपियरच्या नाटकाची अद्भुतरम्यता, काव्यमयता न गमावता, त्यातील प्रेमाविषायीचे हे फटकळ तत्त्वज्ञान आत्मसात करुन मतकरी ते आपल्या स्वत:च्या शैलीत मांडतात. आजच्या पात्रांच्या आधुनिक संवेदनांसह.

शेक्सपियरच्या जगप्रसिद्ध सुखात्मिकेशी समांतर असे आधुनिक जग रचणारे ‘जादू तेरी नजर’, व्यावसायिक रंगभूमीवर फार दिवसांनी पाहावयास मिळालेले एक प्रसन्न, रंगीतसंगीत आणि अर्थपूर्ण नाट्यानुभव ठरले आहे.